थोडे परि निरे। अविट ते घ्यावे खरे ॥
घ्यावे जेणे नये तुटी। बीज वाढे बीजा पोटी ॥

# क्रांतिअग्रणी पर्व

प्रबोधन । संघटन । संघर्षासाठी
पाक्षिक
गुरूवार, २७ ऑगस्ट २०२६

## महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी

### कोयनासह सर्वच धरणे तुडूंब ;
### महाराष्ट्राचे अर्थचक्र बहरणार





संस्थापक
**स्व. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड**

संपादक मंडळ अध्यक्ष
**आ. अरुण लाड**
सदस्य, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य

संपादक : **अशोक पांडूरंग पवार**
मु. पो. कुंडल, मो. ९८२२३५६४३०

प्रकाशक : **उमेश दत्तात्रय पेटकर**
मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

मालक : **अशोक पांडूरंग पवार**
मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

मुद्रक : **लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, कुंडल**
प्रोप्रा. गोविंद किसन डुबल

संपादन, मांडणी : **संस्कृती-पृथ्वी क्रिएशन, सांगली**
मोहन यादव - प्रशांत देसाई
८८०५००७४१६ - ९८५०९७७५०९

**RNI No.: MAHMAR/2008/24954**
**RND/53/KRANTIAGRANIPARV/2025**
**SGL/53/2025-2027**

- वर्ष : १८ वे • अंक : ४५
- गुरूवार, दि. २७ ऑगस्ट २०२६
- पृष्ठे ३२ • मूल्य : ₹२०
- वार्षिक वर्गणी : ₹५००
- कार्यालयीन पत्ता:
  संपादक, 'क्रांतिअग्रणी पर्व' पाक्षिक
  मु.पो. कुंडल - ४१६ ३०९,
  ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)
- email : krantiagrani@gmail.com

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पलूस न्याय कक्षेत)

# अंतरंग

| | |
|---|---|
| चिरडलेले नियोजन! | ४ |
| वेदना अन् संघर्षाचे टोकदार दर्शन | ८ |
| समाजाच्या विवेकबुद्धीने जीव दिलाय | १० |
| उशीर होण्यापुर्वी... | १२ |
| स्कूल ठीक करो... | १४ |
| माऊलीची कहाणी... | १७ |
| ग्राफिक्स | १८ |
| कविता | २० |
| रोबोटिक्समध्ये करिअर | २२ |
| ....'हिरवे सोने' | २४ |
| जस्ट जोकिंग | २७ |
| आखाड्यात अडकली | २८ |
| "टोबॅको" क्षण ! | ३० |

संपादकीय

# हातात जग, पण मनात किती बळ?

आजच्या पिढीकडे ज्ञानाची साधने आहेत, तंत्रज्ञान आहे, माहितीचा महासागर आहे आणि संधींची दारेही खुली आहेत. मात्र, या सगळ्या प्रगतीसोबत मनाची तयारी तितक्याच वेगाने झाली आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. कारण आयुष्य म्हणजे प्रत्येक इच्छा पूर्ण होण्याचा प्रवास

नाही. प्रत्येक प्रयत्नाला यश मिळेलच असे नाही. प्रत्येक नातं टिकेलच असे नाही. प्रत्येक अपेक्षा पूर्ण होईलच असेही नाही. आणि हीच जीवनाची वस्तुस्थिती स्वीकारण्याची मानसिक क्षमता निर्माण करणे, हे शिक्षणाइतकेच महत्त्वाचे आहे.

आपण मुलांना यशस्वी व्हायला शिकवतो; पण अपयश आलं तर काय करायचं, हे किती वेळा शिकवतो? गुण कमी मिळाले, नोकरी मिळाली नाही, प्रेमभंग झाला, व्यवसायात तोटा झाला, घरच्यांनी एखाद्या गोष्टीला नकार दिला किंवा इच्छा पूर्ण झाली नाही, तर त्या परिस्थितीत स्वतःला कसं सावरायचं? हा धडा पुस्तकात नाही; तो घरातून, शाळेतून आणि समाजातून मिळाला पाहिजे.

तरुणाईनेही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, तुमच्या आयुष्यातील एखादी घटना तुमचं आयुष्य नसते. जे आज अशक्य वाटतं, त्यासाठी उद्या नवा मार्ग सापडू शकतो. पण त्यासाठी सर्वप्रथम स्वतःला थोडा वेळ देणं आवश्यक आहे. तीव्र राग, भीती, अपमान किंवा निराशेच्या क्षणी घेतलेला निर्णय पुढील आयुष्यावर परिणाम करू शकतो. त्यामुळे अशा क्षणी थांबणं ही कमजोरी नाही; तीच खरी ताकद आहे.

मन अस्वस्थ असेल, तर एकटं राहू नका. विश्वासू मित्राशी बोला, आई-वडिलांशी बोला, शिक्षकांशी बोला किंवा तज्ज्ञांची मदत घ्या. मदत मागणं म्हणजे आपण कमकुवत आहोत, असा त्याचा अर्थ होत नाही. उलट, स्वतःची अवस्था ओळखून मदतीसाठी पुढे येणं ही परिपक्वतेची खूण आहे.

मनात विचारांचं वादळ सुरू असताना एक संवाद, एक फोन किंवा कोणाची तरी साथ अनेकदा परिस्थिती बदलू शकते. पालकांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. मुलांच्या प्रत्येक इच्छेला होकार देणं म्हणजे प्रेम नव्हे आणि प्रत्येक वेळी नकार देणं म्हणजे कठोरपणा नव्हे. प्रेमामध्ये शिस्त असावी लागते, अपेक्षांमध्ये वास्तव असावं लागतं आणि स्वातंत्र्यासोबत जबाबदारीची जाणीवही द्यावी लागते. मुलांना वस्तू देण्यापेक्षा अनुभव द्या. सततच्या मनोरंजनापेक्षा खेळ, व्यायाम, वाचन, कष्ट आणि संवाद यांची सवय लावा. कारण शरीराला कष्टाची आणि मनाला संयमाची सवय लागली की संकटांसमोर उभं राहण्याची ताकद वाढते.

आज आपल्या घरांमध्ये गुण, करिअर, पैसा आणि यश याबद्दल खूप चर्चा होते; पण भावनांबद्दल किती संवाद होतो? "तुला कसं वाटतंय?" हा प्रश्नही कधी कधी "किती मार्क मिळाले?" या प्रश्नाइतकाच महत्त्वाचा असतो. तरुणाईला केवळ यशाचे मंत्र देऊन चालणार नाही. त्यांना संकटात स्वतःला सावरण्याचे मंत्रही द्यावे लागतील.

नकार स्वीकारण्याची ताकद, अपयशातून शिकण्याची वृत्ती, भावनेच्या भरात थांबण्याची सवय आणि गरज पडल्यास मदत मागण्याचं धैर्य, हीच खरी जीवनशिक्षणाची चार सूत्रे आहेत. कारण एखाद्या क्षणी विवेक हरवला, तर नुकसान मोठं होऊ शकतं; पण त्या क्षणी थोडं थांबण्याची, कोणाशी तरी बोलण्याची आणि पुन्हा विचार करण्याची सवय लागली, तर अनेक आयुष्यांना नवी दिशा मिळू शकते.

तरुणांनो, लक्षात ठेवा, एक इच्छा पूर्ण झाली नाही म्हणून आयुष्य संपत नाही. एक पराभव झाला म्हणून प्रवास थांबत नाही. एक वाईट दिवस आला म्हणून भविष्य काळं होत नाही. आणि समाजानेही हे लक्षात ठेवावं, आपल्याला केवळ बुद्धिमान आणि यशस्वी पिढी घडवायची नाही; तर संकटाच्या काळातही विवेक जागा ठेवून स्वतःला सावरणारी, पुन्हा उभी राहणारी आणि जीवनावर विश्वास ठेवणारी पिढी घडवायची आहे.

# विकासाच्या चाकाखाली चिरडलेले नियोजन!

**महाराष्ट्रात अलीकडच्या पंचवीस तीस वर्षांमध्ये विशेषत: १९९५ नंतर जे राजकारण घडत गेले, त्याने महाराष्ट्राचा विकास बिघडत गेला. उदारीकरणानंतर सर्वाधिक फायदा महाराष्ट्राचा सुरुवातीच्या काळात झाला. त्यानुसार जी गुंतवणूक झाली त्यासाठी आवश्यक असणारी पायाभूत सुविधा उभा करण्यामध्ये महाराष्ट्र मागे पडला.**

**वसंत भोसले,** ज्येष्ठ संपादक, सांगली-कोल्हापूर




कव्हर स्टोरी

केंद्र सरकारने १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना आणि डॉ.मनमोहन सिंग यांनी त्यांच्या मनामध्ये मंत्रिमंडळामध्ये अर्थ खात्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आर्थिक सुधारणा करण्याचा निर्णय घेतला होता. त्याला "खाउजा" म्हटले जात असे. (खासगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण ) देशातील संख्येने मोठ्या असलेल्या वर्गाला तसेच बहुतांश सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांना या आर्थिक सुधारणा मनापासून पटत नव्हत्या. त्यामध्ये जुने परंपरावादी काँग्रेसजन देखील होते. आपल्या देशाची आर्थिक बाजू कमकुवत आहे. मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून जागतिक बाजारपेठेत उतरावे, अशी काही आपली स्थिती नाही. त्यामुळे सावध भूमिका घेतली जावी, असे देखील म्हटले जात होते. तेव्हा एक वाक्य वारंवार उच्चारले जात होते. ते म्हणजे आर्थिक उदारीकरणाला "मानवी चेहरा" असावा. याचाच अर्थ विकासासाठी विकास नको तर त्याच्यामध्ये मानवी हिताला प्राधान्य असावे.

### अर्ध विकसित देश

राजकीय अर्थव्यवस्थेमध्ये देशाच्या नागरिकांचा विचार जरूर करावा लागतो. आर्थिक धोरणे ठरवणे म्हणजे एखादा कारखाना काढणे. त्यासाठी आर्थिक नियोजन करणे, बाजारपेठेचा अभ्यास करणे आणि त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरणे इतक्या मर्यादित अर्थाने देशाच्या अर्थकारणाचा विचार करता येत नाही. हे करीत असताना लोकांना देखील विश्वासात घेतले पाहिजे आणि या अर्थकारणाचा मुख्य उद्देश हा लोककल्याण नेहमीच असावा लागतो. भारतासारख्या अर्ध विकसित देशांमध्ये लोकांची खूप मोठी अपेक्षा सरकारकडून असते. आर्थिक तसेच सर्व पातळीवरील सुधारणांसाठी लोक सरकारकडून अपेक्षा ठेवतात.

अशा अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये खूप मोठी आघाडी घेतली होती. परिणामी महाराष्ट्राचे औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. या महामंडळाच्या माध्यमातून ठिकठिकाणी औद्योगिक वसाहती स्थापन करून उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभ्या करणे, अर्थ पुरवठा करणे, आवश्यक राजकीय तसेच सामाजिक संरक्षण देणे आदि गोष्टींचा त्याच्यामध्ये समावेश होता. त्याच्याच परिणामी मुंबईच्या बाहेर पुण्याच्या परिसरामध्ये पहिल्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण झाले. नंतरच्या काळात ठाणे,.कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक या परिसरात देखील औद्योगीकरणाने गती घेतली.

### पिंपरी -चिंचवड



सर्वात मोठी आघाडी पुण्याला लागून असलेल्या आणि नव्याने औद्योगिक नगरी करण्याच्या विचाराने टाकलेले पावले म्हणजे पिंपरी चिंचवड शहर होय. या दोन खेड्यांसह या परिसराचे शहर तयार करण्यात आले. हा संपूर्ण परिसरच भौगोलिक दृष्ट्या उपयुक्त होता. नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता होती आणि शेजारी पुणे शहर असल्यामुळे मनुष्यबळाचा तुटवडा नव्हता. पुण्यात गेल्या अनेक वर्षापासून विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्था कार्यरत असल्याने चांगले मनुष्यबळ उभा करणे सहज शक्य झाले. पिंपरी- चिंचवड आणि त्याला लागून असलेला चाकणचा परिसर हा औद्योगिक पट्टा तयार झाला. या पट्ट्यामध्ये वाहन उत्पादनाचा मोठ्या प्रमाणात झाला परिणामी आज वाहन उद्योगातील देशातील उत्पादनापैकी ३५ टक्के उत्पादन हे महाराष्ट्रात होते. त्यामध्ये सर्वात मोठा वाटा पिंपरी - चिंचवड ते चाकण या औद्योगिक पट्ट्याचा आहे.

### वाहतुकीची कोंडी

हाच औद्योगिक पट्टा आता सर्वात मोठ्या प्रमाणात चर्चेला आला तो चाकण औद्योगिक वसाहत परिसरामध्ये जी वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे अनेक उद्योजकांनी आपले उद्योग सातारा जिल्ह्यातील खंडाळा परिसरात नव्याने स्थापन झालेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये हलवण्याचा इशारा दिला. परिणामी ही चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली. महाराष्ट्रात सध्या सर्वाधिक भ्रमंती करीत आघाडीवर असलेले पत्रकार राहुल कुलकर्णी यांनी चाकण परिसरामध्ये तळ टाकला आणि या औद्योगिक परिसरातील समस्यांची माहिती घ्यायला सुरुवात केली. तिथल्या

## चेहरा मात्र विद्रूप

कागदोपत्री पाहिले तर चाकण परिसरातील प्रत्येक गावामध्ये पूर्वीसारखीच दोन तीन हजार लोकसंख्या असलेली किंवा मतदार असलेली किंवा लोकसंख्येची नोंद असलेली गावे आजही आहेत. पण त्याच गावांमध्ये किमान ५० ते ६० हजार लोक राहतात. हा सर्व ताण त्या परिसरावर आलेला आहे. त्यामुळेच औद्योगिक वसाहतीमध्ये कामाला जाणाऱ्या कामगारांना वेळेवर पोहोचता येत नाही आणि काम संपल्यानंतर वेळेवर घरी येता येत नाही. अशी अवस्था झालेली आहे. औद्योगिक वसाहतीमध्ये मालपुरवठा करणाऱ्या वाहनधारकांना या वाहतूक कोंडीचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो. या सर्व परिस्थितीची चर्चा अनेक वेळा माध्यमांमध्ये झालेली आहे. अधिकाऱ्यांच्या पातळीवर झालेली आहे. लोकप्रतिनिधी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे आणि राज्य सरकारच्या अख्यारीत हा प्रश्नच जणू येत नाही अशा पद्धतीने त्यांचे वर्तन आहे. चाकण हा औद्योगिक वसाहतीचा पट्टा असला विकासाचा तो भाग असला तरी त्याचा चेहरा मात्र विद्रूप झालेला आहे. हे दुर्दैवाने येथे नमूद करावे लागते. याची गांभीर्याने नोंद घेऊन राज्य शासनामध्ये बसलेले लोक काहीतरी करतील अशी काही अपेक्षा व्यक्त करावी का न करावी, असा प्रश्न पडतो. कारण सध्याच्या राज्यकर्त्यां कडे शाश्वत विकासाचा कोणताही दृष्टिकोन नाही. किंबहुना त्यांना त्याविषयी आस्था देखील नाही.

# बदल लक्षात घेऊन नियोजन आवश्यक

**चाकण औद्योगिक परिसरातील ज्या समस्या उभ्या राहिलेल्या आहेत त्या खूप गंभीर आहेत. त्या परिसरातील अनेक गावांमध्ये हजारोच्या संख्येने परप्रांतीय लोक येऊन राहिलेले आहेत. राहुल कुलकर्णी यांनी एका उपसरपंचांची मुलाखत घेतली. त्यांनी दोनशे खोल्या भाड्याने देण्यासाठी बांधलेल्या आहेत. हाच त्यांचा मुख्य व्यवसाय झाला आहे. कारण त्यांची जमीन औद्योगीकरण आणि शहरीकरणांमध्ये गेली. त्यांनी उत्पन्नाचे साधन आता या कामगारांना निवासाची सोय आणि जेवणाची सोय करण्यातून करणे हेच आता स्वीकारले आहे. प्रत्येक खोलीमध्ये किमान चार कामगार राहतात. असे ते सांगत होते. याचा अर्थ त्यांच्याकडे आठशे लोक राहिला आहेत. काहींच्याकडे पाचशे खोल्या आहेत, असे ते म्हणत होते. इतक्या मोठ्या प्रमाणात बाहेरून आलेल्यांची संख्या आहे त्या सर्व उपसरपंच असलेल्या गावाची मतदारांची संख्या साडेतीन हजार आहे. मात्र त्या ग्रामपंचायतीवर पन्नास हजार लोकांना सेवा**



**पुरवण्याची जबाबदारी येऊन पडते. अशा प्रकारे लोकसंख्येची भौगोलिक रचनाच बदलून गेली आहे. याकडे महाराष्ट्राच्या नियोजन खात्याचे लक्ष नाही. रस्ते करणे, पाणीपुरवठ्याची सोय करणे, दिवाबत्तीची सोय करणे, आरोग्याची सोय सुविधा उपलब्ध करून देणे, शिक्षणाची व्यवस्था करणे आणि लोकांच्या सामाजिक-सांस्कृतिक गरजा पूर्ण करणे आदींचा ताण पडतो आहे. त्यामुळे हे सर्व बदल लक्षात घेऊन नियोजन करणे आवश्यक असते.**

स्थानिक मूलनिवासी लोकांशी बोलले. कामगार म्हणून किंवा कर्मचारी म्हणून जे परप्रांतीय लोक मोठ्या प्रमाणात आलेत त्यांच्याशी त्यांनी चर्चा केली. राजकीय कार्यकर्ते आणि नेत्यांशी त्यांनी संवाद साधला आणि विशेष म्हणजे जे उद्योजक चाकण परिसरातून आपले उद्योग स्थलांतरित करण्याचा निर्णय घेऊ इच्छितात त्यांच्याशी देखील त्यांनी संवाद साधला.

या सर्व चर्चेमध्ये दोन गोष्टी स्पष्टपणे समोर येत होत्या. पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासामध्ये पिंपरी- चिंचवड ते चाकण या परिसराने मोठे योगदान दिले आहे. उदारीकरणाची भूमिका जेव्हा केंद्र सरकारने घेतली त्यानंतर या औद्योगिक पट्ट्यामध्ये दहा लाख कोटीहून अधिक गुंतवणूक झाली असल्याची शक्यता आहे. (हा आकडा अधिकृत नाही, हा अंदाज आहे ) येथे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले कारखाने सुरू केले. या कंपन्यांना लागणाऱ्या सुट्ट्या भागांचा पुरवठा करणारी मोठी कारखानदारी उभी राहिली. सध्या जे कारखानदार या परिसरातून स्थलांतरित होण्याचा विचार करीत आहेत त्यामध्ये अशा प्रकारचे सुट्टी भाग तयार करणाऱ्यांची मोठी संख्या आहे. याचे कारण चाकण परिसरामध्ये ज्या दोन औद्योगिक वसाहती उभ्या राहिल्या. त्या अनेक गावांच्या जमिनीवर उभ्या आहेत. याचे क्षेत्र जवळपास चाळीस हजार एकर सांगितले जाते.

हा आकडा देखील अधिकृत नसला तरी राहुल कुलकर्णी यांच्याशी जे लोक बोलत होते त्यांच्या चर्चेतून हा पुढे आला होता. त्यांनी एका गावामध्ये भेट दिली. ज्या गावाच्या परिसरात औद्योगीकरण झालेला आहे ते गाव चाकण परिसरात आहे. या गावची लोकसंख्या केवळ साडेतीन हजार आहे. तेथील एका उपसरपंचांच्या घरी त्यांनी भेट दिली.

तेव्हा त्यांनी सांगितलेली माहिती खूप धक्कादायक आहे. या साडेतीन हजार लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये परप्रांतातून पन्नास हजाराहून अधिक लोक राहण्यासाठी आलेले आहेत. हे परप्रांतीय कामगार या गावांमध्ये खोल्या घेऊन राहतात आणि शेजारच्या औद्योगिक वसाहतीमध्ये कामाला जातात. चाकण हे गाव पुणे - नाशिक महामार्गावर आहे. पुण्याहून नाशिकला जाणारी संपूर्ण वाहतूक या गावातूनच अनेक जाते. हा एकमेव महामार्ग असेल जो दोन मोठ्या शहरांना जोडतो, पण हा महामार्ग विकसित करण्याचा प्रयत्न गेल्या पन्नास वर्षात झाला नाही.

**द्रुतगती महामार्ग**

पुणे ते मुंबई द्रुतगती महामार्ग करीत असताना पुणे ते नाशिक आणि नाशिक ते मुंबई हे दोन्ही मार्ग देखील त्याच पद्धतीने विकसित करणे आवश्यक होते. महाराष्ट्रातील अनेक अभ्यासक तसेच राजकीय नेते मुंबई- पुणे- नाशिक- मुंबई कॉरिडोर असा उल्लेख नेहमी करतात. मुंबई ते पुणे आणि पुणे ते नाशिक (व्हाया पिंपरी चिंचवड चाकण) नाशिक ते ठाणे, ठाणे ते मुंबई या पट्ट्यामध्येच विकास झाला. औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाले उर्वरित महाराष्ट्र मात्र उपेक्षित राहिला. अशी तक्रार करीत चर्चा नेहमीच केली जाते. ज्या पद्धतीने आर्थिक उदारीकरणाला मानवी चेहरा पाहिजे असे नेहमीचे वाक्य फेकले जाते. तसेच महाराष्ट्रामध्ये मुंबई - पुणे - नाशिक हा कॉरिडॉर अशी बोलण्याची पद्धत रूढ झाली आहे. पण ज्या पद्धतीने पुणे ते मुंबई एक्सप्रेस वे करण्यात आला. त्याचवेळी पुणे ते नाशिक आणि नाशिक ते मुंबई हा देखील एक्सप्रेस वे तातडीने करणे आवश्यक होते. यापैकी नाशिक ते पुणे हा मार्ग एक्सप्रेस वे मध्ये रूपांतरित करणे सोपे होते. कारण या मार्गावर चंदनापुरीचा घाट वगळला तर कोठेही अडथळा निर्माण होईल अशी परिस्थिती नाही. एक-दोन नद्यांचे प्रवाह मध्ये आडवे येतात. पण त्या नद्या फारशा मोठ्या नाहीत. त्यावरून आठ पदरी पूल बांधणे सहज शक्य झाले असते. तसेच चाकण किंवा संगमनेर, आळेफाटा, सिन्नर या सर्व गावांना बाजूला करून बाह्यवळण तयार करणे सहज शक्य झाले असते.

याकडे दुर्लक्ष केल्याने चाकण सारखा परिसर आज केवळ रस्ते नाहीत, वाहतुकीची प्रचंड कोंडी होते, कामगारांना कारखान्यातून घरापर्यंत जाण्यासाठी दररोज चार-पाच तास वेळ वाया घालवावा लागतो. या वाहतूक कोंडीचा त्यांना प्रचंड मनस्ताप होतो. जे कामगार कुटुंबासह तिथे राहायला आहेत. त्यांच्या मुलांना किंवा जे स्थानिक मूलनिवासी लोक आहेत त्यांना दैनंदिन जीवन जगणे असह्य होऊन गेलेले आहे. चाकण सारख्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण करून महाराष्ट्राने खूप मोठी प्रौढी मिळवली असली तरी या चाकण परिसरात ज्या पायाभूत सुविधा आवश्यक होत्या. त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करून या जागतिक पातळीवरच्या औद्योगिक पट्ट्याचा विकासाचा चेहरा विद्रूप करून टाकण्यात आलेला आहे. हा एक प्रकारे महाराष्ट्राचा चेहरा विद्रूप करण्यासारखाच प्रकार आहे. कारण महाराष्ट्र नेहमीच पुढारलेले राज्य असे आपण म्हणतो. महाराष्ट्राने अलीकडच्या पंचवीस तीस वर्षांमध्ये विशेषतः १९९५ नंतर राज्याचे राजकारण घडत गेले या राजकारणाने महाराष्ट्राचा विकास बिघडत गेला. उदारीकरणानंतर सर्वाधिक फायदा महाराष्ट्राचा सुरुवातीच्या काळात झाला. त्यानुसार जी गुंतवणूक झाली त्यासाठी आवश्यक असणारी पायाभूत सुविधा उभा करण्यामध्ये महाराष्ट्र मागे पडला.

नेमक्या याच कालावधीत दक्षिणेकडील राज्यांनी मात्र सुधारणा केल्या. एकेकाळी दारिद्र्याने पिंजलेला तमिळनाडू सुधारला. आंध्र प्रदेश किंवा कर्नाटकचा उत्तर भाग विकसित झाल्याचे दिसतो आहे. कर्नाटकचा दक्षिण भाग पूर्वीपासूनच विकसित होता. तेलंगणा, तमिळनाडू केरळ या राज्याने सर्वच पातळीवरती खूप प्रगती केली आहे. कोल्हापूर ते बंगलोर आपण पश्चिम महाराष्ट्रातील लोक नेहमीच प्रवास करीत असतो. त्याला पुन्हा पुणे – बेंगलोर रस्ता (पी. बी रोड) म्हणतात. कोल्हापूरहून बेंगलोरकडे जात असताना सहा जिल्ह्यांची मुख्यालये असलेली शहरे लागतात. त्यामध्ये बेळगाव, धारवाड, हावेरी, दावणगेरे, चित्रदुर्ग आणि तुमकुर शहरांचा समावेश आहे. याशिवाय अनेक तालुक्यांची शहरे या महामार्गावर आहेत. पण या सर्व महामार्गांना बाह्यवळण ( म्हणजे बायपास रोड) देण्यात आलेला आहे. कोणत्याही शहरात जावे लागत नाही.

पुणे ते नाशिक हा महामार्ग आजही तयार होत नाही. महाराष्ट्राच्या नकाशावरील या दोन मुख्य शहरांना जोडणारा चाकणमधून जाणारा हा एकमेव मार्ग आहे. नाशिक ते पुणे रेल्वे मार्ग देखील करून घेण्यात आला नाही. हवाई वाहतूकची सोय नाही. आजही पुणे ते नाशिक जाण्यासाठी पाच सहा तास लागतात, ही शोकांतिका आहे.

# 'ओडिसी' मानवी वेदना अन् संघर्षाचे टोकदार दर्शन

**सिनेमा गली**

**महायुद्धांचा शेवट केवळ रणांगणावर होत नसतो. युद्धभूमीवर सांडलेले रक्त सुकले, तरी योध्दांच्या मानसिकतेत आणि पराभूतांच्या उद्ध्वस्त शहरांत युद्धाचे पडसाद अनेक दशके घुमत राहतात. ग्रीक पुराणातील 'ट्रोजन युद्ध' हे अशाच एका महाविनाशाचे प्रतीक आहे. ट्रॉय शहराची राखरांगोळी झाल्यानंतर सुरू झालेला 'ओडिसियस'चा परतीचा प्रवास म्हणजेच 'ओडिसी'. याच महाकाव्याला ख्रिस्तोफर नोलनसारख्या प्रतिभावान दिग्दर्शकाने जेव्हा रुपेरी पडद्यावर आणले आहे, तेव्हा तो केवळ एका योद्याचा प्रवास राहत नाही, तर तो मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा, मानवी अहंकाराचा आणि अस्तित्वाच्या शोधाचा एक अस्वस्थ करणारा दस्तऐवज बनतो.**

**सुधींद्र देशपांडे**, मुंबई

नोलनची 'ओडिसी' ही केवळ एक पौराणिक कथा नाही, तर मानवाच्या नियतीशी असलेल्या चिरंतन संघर्षावर केलेले एक प्रगल्भ भाष्य आहे. होमरच्या 'इलिअड' मध्ये ट्रॉयच्या युद्धाचा आणि अकिलीसच्या क्रोधाचा थरार होता. पण 'ओडिसी'ची कथा ही युद्धाच्या नंतरची आहे. ट्रॉय जिंकल्यानंतर विजयाच्या उन्मादात ओडिसियस आणि त्याच्या सैन्याने ज्या क्रूरतेने ट्रॉयचा विध्वंस केला, ती क्रूरता मानवी सभ्यतेच्या उंबरठ्यावर उभी राहून आपल्याला प्रश्न विचारते. नोलनने चित्रपटाची सुरुवातच या विध्वंसातून केली आहे. विजयाचा आनंद साजरा करण्याऐवजी, नोलनचा ओडिसियस एका उद्विग्नतेत अडकलेला दिसतो. इथूनच खरा संघर्ष सुरू होतो, तो निसर्ग आणि माणूस, देव आणि दानव यांच्यातला नसून, तो पाशवी प्रवृत्तीतून 'सभ्यतेकडे' जाण्याचा मानवी प्रवास आहे.




या कलाकृतीत नोलनने ग्रीक देवदेवतांना आकाशात ढगांवर बसलेले चमत्कारिक घटक न ठेवता, त्यांना मानवी प्रवृत्तींची आणि निसर्गाच्या अथांग शक्तींची रूपके बनवली आहेत. समुद्राचा देव 'पोसायडन' हा केवळ त्रिशूळ घेतलेला देव नाही, तर तो मानवी नियंत्रणाच्या पलीकडे असणाऱ्या अनियंत्रित निसर्गाचा आणि नियतीचा कोप आहे. ओडिसियसचा प्रवास हा याच अथांग नियतीला बुद्धिमत्तेच्या (अथेना) जोरावर आव्हान देण्याचा प्रवास आहे.

चित्रपटातील पात्रांची मांडणी नोलनने अत्यंत सूक्ष्म राजकीय आणि सामाजिक भान ठेवून केली आहे. ओडिसियसची पत्नी पेनेलोपी ही केवळ एक 'वाट पाहणारी अबला' नाही. इथाका या त्यांच्या राज्यावर ताबा मिळवण्यासाठी जमलेल्या सत्ताकांक्षी आणि उर्मट सरदारांना ती तब्बल वीस वर्षे ज्या राजकीय मुत्सद्दीपणाने झुलवत ठेवते, ते दृश्य अंगावर येणारे आहे. दिवसा विणकाम करायचे आणि रात्री ते उसवून टाकायचे, ही तिची कृती केवळ वेळेला चकवा देण्याची युक्ती नाही, तर ती एका कोसळू पाहणाऱ्या राजकीय व्यवस्थेला आणि सभ्यतेला तगवून ठेवण्याची धडपड आहे. दुसरीकडे त्यांचा मुलगा टेलेमाकस



# आजच्या गुंतागुंतीच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेतही चपखल

ऐतिहासिक आणि सभ्यतावादी दृष्टिकोनातून पाहिल्यास, 'ओडिसी' हा मानवाचा देवतांच्या आहारी जाण्याकडून स्वतःच्या बुद्धिमत्तेवर विश्वास ठेवण्याकडचा प्रवास आहे. अथेना ही बुद्धीची देवता ओडिसियसला मदत करते, कारण ओडिसियस हा अंधश्रद्धेवर नव्हे, तर तर्कावर विसंबून असणारा पहिला 'आधुनिक' नायक आहे. नोलनने या प्रवासातील अथांग समुद्र, वादळे आणि बेटे यातून मानवी मनाचा एकाकीपणा आणि अस्तित्वाचा संघर्ष अत्यंत गडद रंगांत रंगवला आहे. ख्रिस्तोफर नोलनची 'ओडिसी' ही नुसती ग्रीक पुराणाची उजळणी नाही. हा चित्रपट आपल्याला विचार करायला लावतो की, आज आपण जी तथाकथित आधुनिक सभ्यता उभी केली आहे, तिचा पाया कोणत्या मूल्यांवर आधारित आहे ? आजही प्रत्येक माणूस त्याच्या आयुष्यात एका 'इथाका'च्या शोधात वणवण भटकत असतो. त्याच्याही वाट्याला अनेक ट्रॉयची युद्धे, मोहाची बेटे आणि संकटांचे महासागर येतात. ओडिसियसचा हा लढा काल जितका सत्य होता, तितकाच तो आजच्या गुंतागुंतीच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेतही चपखल बसतो. तंत्रज्ञानाच्या आणि भव्यतेच्या आवरणाखाली मानवी वेदनेचे आणि संघर्षाचे इतके टोकदार दर्शन घडवणे, हे केवळ नोलनसारखा दिग्दर्शकच करू जाणे.

हा बापाच्या छत्राविना वाढलेला, पण स्वतःची ओळख आणि वारसा शोधू पाहणाऱ्या एका नव्या पिढीचा प्रतिनिधी आहे. अराजकतेच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या इथाकाला वाचवण्यासाठी पेनेलोपीचा संयम आणि टेलेमाकसची धडपड हा या कथेचा भक्कम सामाजिक आणि राजकीय कणा आहे.

नोलनच्या दिग्दर्शनाचे खरे यश ओडिसियसच्या प्रवासातील 'काळाच्या' आणि 'मोहाच्या' हाताळणीत आहे. सायरन्सचे गाणे, सायक्लोप्स (एकडोळ्या राक्षस) सोबतचा संघर्ष किंवा चेटकीण सर्सीचे आव्हान हे नुसते 'ॲक्शन सिक्वेन्स' वाटत नाहीत. हे सारे मानवी सभ्यतेला मागे खेचणारे आदिम धोके आहेत. त्यातही 'कॅलिप्सो' या अप्सरेच्या बेटावरील ओडिसियसचा अडकलेला काळ नोलनने ज्या पद्धतीने चित्रित केला आहे, तो त्याच्या 'इंटरस्टेलर'मधील काळाच्या संकल्पनेची आठवण करून देतो. कॅलिप्सो ओडिसियसला अमरत्वाची आणि चिरंतन तारुण्याची ऑफर देते. पण ओडिसियस ती नाकारतो. अमर होऊन एका देवतेसोबत सुखात जगण्यापेक्षा, मर्त्य माणसासारखे म्हातारे होणे आणि आपल्या पत्नीसोबत दुःख, वेदना सहन करत इथाकामध्ये मरण पावणे तो पसंत करतो. हा निर्णय चित्रपटाचा आणि ओडिसियसच्या तत्त्वज्ञानाचा कळसाध्याय आहे. मानवी सभ्यता ही अमरत्वात नाही, तर मानवी नात्यांच्या नश्वरतेत आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अर्थपूर्ण जगण्यात दडलेली आहे, हे नोलन इथे ठळकपणे मांडतो.



समाजमन

# समाजाच्या विवेकबुद्धीने जीव दिलाय

**नुकत्याच १९ वर्षांच्या एका मुलाने नव्या iPhone Pro 15 साठी व कौंटुबिक वादातून छत्रपती संभाजीनगरमधील तिसगाव परिसरातील खवड्या डोंगराच्या कड्यावरून आत्महत्या केली. त्याला वाचवण्याचा प्रयत्न करताना त्याचे वडील आणि तो मुलगा दोघेही त्या कड्यावरून खाली कोसळले. हे पाहून मानसिक धक्क्यातून त्यांच्या आईनेही पुढच्या काही सेकंदांत त्याच कड्यावरून उडी घेतली. एका मिनिटात एक संपूर्ण कुटुंब संपलं. ही घटना मन सुन्न करणारी आहे. पण ही केवळ एका कुटुंबाची आत्महत्या नाही. ही घटना आजच्या कुमारवयीन मुलांच्या आयुष्याकडे पाहण्याच्या पद्धतीकडे लक्ष वेधणारी एक गंभीर आणि सूचक घटना आहे.**

**डॉ. अमोल अन्नदाते, पुणे**

आत्महत्या आणि डिप्रेशन हे मानसिक आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहेत. त्यावर उपचार शक्य आहेत. मात्र, गेल्या दोन दशकांत आपण मुलांच्या मनाला ज्या काही सवयी लावल्या आहेत, त्यांचाही त्यांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम झाला आहे. पूर्वी १६ व्या वर्षी ज्ञानेश्वर माऊलींनी काय केलं, छत्रपती शिवाजी महाराजांनी काय पराक्रम केला, हे मुलांना सांगितलं जायचं. आज तसं सांगण्याचे दिवस कदाचित बदलले आहेत. पण त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे मुलांना आयुष्य जगण्याची मानसिक ताकद आपण देतोय का?

आज मुलांना अगदी लहान वयापासून Instant Gratification ची सवय लागते आहे. म्हणजे हवी ती गोष्ट, हवा तो आनंद आणि हवं ते समाधान ताबडतोब मिळालं पाहिजे, अशी मानसिकता. आणि जेव्हा ती गोष्ट लगेच मिळत नाही, तेव्हा निराशा येते.

इन्स्टंट ग्रॅटिफिकेशन अपेक्षा गोष्ट न मिळाल्याने निराशा अस्वस्थता विचारांवरचा ताबा सुटणे या चक्रामध्ये आज समाजमन अडकलेलं आहे. फोन हे त्याचं एक निमित्त असू शकतं. पण प्रश्न फक्त फोनचा नाही. प्रश्न आहे तो मुलांना प्रत्येक वेळी त्यांच्या मनासारखं मिळण्याची सवय लावण्याचा. मुलं स्वयंपूर्ण होईपर्यंत त्यांना प्रत्येक गोष्ट सहज मिळेलच असं नाही, हे त्यांना शिकवणं गरजेचं आहे. कधी दहापैकी नऊ वेळा 'नाही' आणि एकदाच 'हो', असंही असलं पाहिजे. ही सवय अगदी चौथ्या-पाचव्या वर्षापासून लागणं गरजेचं आहे. यासोबतच आपण रोजच्या आयुष्यात आनंदाचे स्रोत कोणते ठेवतो, हेही तितकंच महत्त्वाचं आहे.

आपण मर्त्य मानव आहोत. आयुष्यात संकटं येणारच आहेत, हे गृहीत धरून त्यांना तोंड देण्याची मानसिक शक्ती प्रत्येकामध्ये निर्माण करावी लागेल. आणि ही शक्ती आपोआप तयार होत नाही. ती कुटुंबातून, संस्कारातून आणि रोजच्या सवयींतून तयार होते. म्हणूनच पूर्वी आपल्याला पहाटे ब्रह्ममुहूर्तावर उठायला सांगितलं जायचं. कारण ते कठीण असतं. झोपावंसं वाटत असताना उठणं, कंटाळा असताना व्यायाम करणं, आवडत नसतानाही एखादं आवश्यक काम पूर्ण करणं दिवसभरातील अशा छोट्या-छोट्या कठीण गोष्टी आपल्या मेंदूला अस्वस्थतेशी जुळवून घेण्याचं प्रशिक्षण देतात. तुम्हाला मन थोडं अस्थिर वाटत असेल किंवा लो वाटत असेल आणि तुम्ही गार पाण्याने अंघोळ केली, तर काही वेळाने बरं का वाटतं? कारण त्या क्षणी तुमचं शरीर आणि मन अनकम्फर्टेबल परिस्थितीत राहण्याचं प्रशिक्षण घेत असतं. आणि हीच मानसिक ताकद पुढे संकटांचा सामना करताना उपयोगी पडते. आता महत्त्वाची गोष्ट -Amygdala Hijack. मेंदूमध्ये ॲमिग्डाला हा भावनिक प्रतिक्रियांशी संबंधित महत्त्वाचा भाग आहे. एखादी भावना तीव्र झाली, तर आपण विचार न करता लगेच कृती करण्याच्या अवस्थेत जाऊ शकतो. राग, भीती, संताप किंवा निराशेच्या भरात काहीतरी टोकाचं करण्याच्या तयारीत असतो. अशा वेळी सर्वात महत्त्वाचं आहे - थांबणं. फक्त काही सेकंद स्वतःला दिले, तरी तीव्र प्रतिक्रिया कमी होण्यास मदत होऊ शकते.

## अशा वेळी तीन गोष्टी करा

पहिली - हळू आणि खोल श्वास घ्या. दुसरी - १० पासून १ पर्यंत उलटी आकडेमोड करा. तिसरी - तुम्हाला जाणवत असलेल्या भावनेला नाव द्या. "मला राग आला आहे." "मला भीती वाटते आहे." "मला खूप निराश वाटतंय." या तीन साध्या गोष्टी आपल्याला त्या क्षणापासून थोडं दूर घेऊन जातात आणि पुन्हा विचार करण्यासाठी वेळ देतात. पण ही गोष्ट मुलांना एकदा सांगून समजणार नाही. ती त्यांना वारंवार शिकवावी लागेल आणि प्रत्यक्ष करून दाखवावी लागेल. मुलं जेव्हा आक्रमक होतात, रागावतात किंवा लगेच प्रतिक्रिया देतात, तेव्हा त्यांच्यावर ओरडण्याऐवजी आपण त्यांना भावनांचं नियमन कसं करायचं, हे शिकवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण भावना चुकीच्या नसतात. पण त्या भावनेतून आपण काय कृती करतो, हे महत्त्वाचं असतं.

## भावनिक मंत्र देण्याची गरज

छत्रपती संभाजीनगरच्या त्या डोंगराच्या कड्यावर घडलेली घटना एका मिनिटात एका कुटुंबाला घेऊन गेली. अशी घटना कोणाच्याही कुटुंबात घडू शकते. पण ती घडू नये. आणि पुन्हा पुन्हा अशा घटना पाहण्याची वेळ आपल्यावर येऊ नये, यासाठी आपण आपल्या मुलांना केवळ चांगलं शिक्षण देऊन भागणार नाही. त्यांना भावनिक शिक्षण द्यावं लागेल. त्यांना नकार स्वीकारायला शिकवावं लागेल. कष्ट करायला शिकवावं लागेल. थांबायला शिकवावं लागेल. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे अत्यंत तीव्र भावनेच्या क्षणी विवेकाने निर्णय घ्यायला शिकवावं लागेल. कारण आज आपल्या मुलांना केवळ यशाचे मंत्र देण्याची गरज नाही. त्यांना संकटातही स्वतःला सावरण्याचे भावनिक मंत्र देण्याची गरज आहे. हा मंत्र प्रत्येक घरात पोहोचणं गरजेचं आहे. कुमारवयीन मुलांसाठीही आणि त्यांच्या पालकांसाठीही.




# उशीर होण्यापुर्वी...

आजार गंभीर असतात, उपचार कठीण असतात आणि मृत्यूची चाहूलही अनेकदा भयावह असते. पण एका आयसीयू डॉक्टरच्या अनुभवातून समोर आलेलं एक कटू सत्य अधिक अस्वस्थ करणारं आहे, अनेकदा आजारापेक्षा जास्त नुकसान 'उशिरा' केलेलं असतं. उपचारातला उशीर असो की नात्यांमध्ये प्रेम व्यक्त करण्याचा 'नंतर' या एका शब्दाची किंमत कधी कधी संपूर्ण आयुष्याला मोजावी लागते.

**डॉ. अखिलेश राजूरकर,**
एक आयसीयू डॉक्टर, पुणे

डॉक्टर झाल्यावर आजारांची भीती हळूहळू कमी होत गेली. कॅन्सर, हार्ट अटॅक, स्ट्रोक, सेप्सिस, किडनी फेल्युअर नावं मोठी असतात, आजार गंभीर असतात. पण वर्षानुवर्षं त्यांच्यासोबत काम केलं की त्यामागचं विज्ञान समजू लागतं. काय तपासायचं, कधी औषध सुरू करायचं, कधी रुग्णाला आयसीयूमध्ये घ्यायचं, कधी ऑपरेशन करायचं आणि कधी पुढच्या सेंटरला पाठवायचं हळूहळू भीतीच्या जागी निर्णय घेण्याची सवय येते. पण या सगळ्या वर्षांत एक गोष्ट मात्र मला जास्तीत जास्त घाबरवायला लागली. ती म्हणजे-उशीर. कारण अनेकदा आजारापेक्षा जास्त नुकसान आजाराने केलेलं नसतं ते उशिराने केलेलं असतं.

छातीत दुखत होतं. "गॅस असेल." दोन तास गेले. घाम फुटायला लागला. "थोडं बघूया." आणखी एक तास गेला. हॉस्पिटलमध्ये येईपर्यंत हृदयाचा मोठा भाग आधीच नुकसान झालेला असतो. कधी हात-पाय अचानक कमकुवत होतात, बोलणं अडखळतं. पण घरात चर्चा सुरू होते-"थोडं झोपू द्या." "बीपी असेल." "सकाळी डॉक्टरकडे जाऊ." आणि ज्या काही तासांत उपचाराने आयुष्य बदलू शकत होतं, ते तास निघून जातात. मग नातेवाईक माझ्यासमोर बसतात आणि एकच प्रश्न विचारतात -"डॉक्टर थोडं आधी आणलं असतं तर?" हा प्रश्न मी अनेकदा ऐकला आहे. आणि खरं सांगायचं तर, या प्रश्नाचं उत्तर देणं नेहमीच सोपं नसतं. कारण काही वेळा उत्तर असतं-हो. थोडं आधी आलात असता तर कदाचित चित्र वेगळं असतं. आणि त्या एका "कदाचित" मध्ये किती पश्चात्ताप भरलेला असतो, हे फक्त त्या कुटुंबाला माहीत असतं.

मेडिकलमध्ये आम्हाला वेळेचं महत्त्व खूप लवकर शिकवलं जातं. हार्ट अटॅकमध्ये वेळ महत्त्वाचा. स्ट्रोकमध्ये वेळ महत्त्वाचा. सेप्सिसमध्ये वेळ महत्त्वाचा. ट्रॉमामध्ये वेळ महत्त्वाचा. पण आयुष्याने मला नंतर शिकवलं-फक्त आजारांमध्येच नाही, नात्यांमध्येही वेळ महत्त्वाचा असतो. फरक एवढाच आहे की, शरीरात उशीर झाला तर त्याची खूण रिपोर्टमध्ये दिसते; नात्यात उशीर झाला तर कोणताच रिपोर्ट येत नाही.

आपण आईला म्हणतो-"नंतर बोलतो." वडिलांचा फोन येतो-"आत्ता थोडं कामात आहे, संध्याकाळी करतो." मुलं म्हणतात-"आज माझ्यासोबत बस ना." आपण म्हणतो-"रविवारी नक्की." जुना मित्र भेटायचं म्हणतो-"पुढच्या

## स्वतःला तीन प्रश्न विचारा

**ज्या आरोग्याच्या गोष्टीकडे तुम्ही महिन्यांपासून दुर्लक्ष करत आहात, ती अजून किती पुढे ढकलणार? ज्या माणसाशी बोलायचं आहे, त्याला फोन करण्यासाठी नेमका कोणता योग्य दिवस येण्याची वाट पाहत आहात? आणि जी एक गोष्ट तुम्हाला आतून माहीत आहे की आजच करायला हवी, ती अजून "नंतर"वर का ठेवली आहे? कदाचित उद्याही वेळ असेल. बहुधा असेल. पण डॉक्टर म्हणून मी इतकंच शिकलो आहे, "बहुधा" आणि "नक्की" यांच्यात कधी कधी संपूर्ण आयुष्याचं अंतर असतं. म्हणून काही गोष्टींसाठी "नंतर" हा शब्द खूप महाग असतो.**

महिन्यात भेटू." एखाद्याची माफी मागायची असते-"थोडं शांत झाल्यावर बोलेन." कुणाला सांगायचं असतं-"तू माझ्यासाठी महत्त्वाचा आहेस." पण ते शब्द आपण पुढे ढकलत राहतो. कारण आपल्या मनात एक गृहीतक असतं-वेळ आहे. उद्या आहे, पुढचा रविवार आहे, पुढचं वर्ष आहे, नंतर बोलता येईल.

पण डॉक्टर म्हणून एक गोष्ट मी पुन्हा पुन्हा पाहिली आहे-आयुष्य आपल्याला 'नंतर'ची हमी देत नाही. आजाराला वेळेची जाणीव नसते. अपघाताला तुमच्या प्लॅनची माहिती नसते. मृत्यू तुमचं कॅलेंडर पाहून येत नाही. आणि म्हणूनच काही गोष्टींचा पश्चात्ताप माणसाला चुकीचा निर्णय घेतल्यामुळे होत नाही; तो निर्णय वेळेत न घेतल्यामुळे होतो. कधी उपचार सुरू करण्यात उशीर, कधी मदत मागण्यात उशीर, कधी "मला त्रास होतोय" हे कबूल करण्यात उशीर, कधी एखाद्या माणसाला समजून घेण्यात उशीर, कधी माफी मागण्यात, प्रेम व्यक्त करण्यात किंवा फक्त त्याच्या जवळ बसण्यात उशीर.

आणि या सगळ्यात एक फार विचित्र गोष्ट आहे. आपण पैशाबाबत खूप सावध असतो. पैसा कुठे जातोय याचा हिशोब ठेवतो; पण वेळ कुठे जातोय याचा हिशोब ठेवत नाही. एक दिवस कसा गेला, एक आठवडा, एक वर्ष कळलतही नाही. आणि मग अचानक एखाद्या हॉस्पिटलच्या खोलीत, एखाद्या अंत्यसंस्कारात, एखाद्या रिकाम्या घरात किंवा एखाद्या तुटलेल्या नात्यापुढे उभं राहून आपण स्वतःलाच विचारतो-"मी थोडं आधी का नाही केलं?"

हा "थोडं आधी" हा शब्द मला डॉक्टर म्हणून खूप घाबरवतो. कारण काही वेळा तो फक्त दोन तास असतो, काही वेळा दोन महिने, काही वेळा दहा वर्षं आणि काही वेळा संपूर्ण आयुष्य. आपण अनेकदा योग्य वेळेची वाट पाहत बसतो. बिझनेस थोडा स्थिर झाला की, मुलं मोठी झाली की, घराचं कर्ज संपलं की, एक प्रोजेक्ट पूर्ण झाला की, प्रमोशन झालं की, थोडे पैसे अजून जमा झाले की मग जगू, मग फिरू, मग आई-वडिलांसोबत वेळ घालवू, मग स्वतःकडे लक्ष देऊ, मग आरोग्य तपासू, मग मित्रांना भेटू, मग मनातलं बोलू.

पण हे "मग" कधी येतंच नाही. कारण एका धावपळीच्या शेवटी दुसरी धावपळ उभी असते. एक जबाबदारी संपते, दुसरी सुरू होते. एक ध्येय पूर्ण होतं, दुसरं तयार होतं. आणि आपण जगण्याला सतत पुढच्या तारखेवर ढकलत राहतो. मला असं अजिबात म्हणायचं नाही की सगळं सोडून आजच जगायला सुरुवात करा. जबाबदाऱ्या असतात, पैसा कमवावा लागतो, काम करावंच लागतं, भविष्याची तयारी करावी लागते. पण भविष्यासाठी वर्तमान पूर्णपणे गहाण ठेवायचं का-हा प्रश्न मात्र प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. कारण डॉक्टर म्हणून मी इतकं नक्की पाहिलं आहे, अनेकांना शेवटच्या क्षणी अजून पैसा हवा नसतो. त्यांना अजून थोडा वेळ हवा असतो.

आणखी एक फोन, आणखी एक भेट, आणखी एक जेवण एकत्र, आणखी एकदा "बाबा" म्हणणारा आवाज, आणखी एकदा मुलाला मिठी, आणखी एकदा घरी परत जाणं. कदाचित म्हणूनच आता एखादा माणूस मला म्हणतो, "डॉक्टर, पुढच्या महिन्यात तपासणी करतो." तेव्हा माझ्या मनात एक प्रश्न येतो- का पुढच्या महिन्यात? आणि एखादा मित्र म्हणतो, "निवांत भेटू कधीतरी." तेव्हा वाटतं, कधीतरी म्हणजे नेमकं कधी? कारण काही गोष्टींमध्ये उशीर म्हणजे फक्त उशीर नसतो. कधी तो संधी गमावणं असतो, कधी आरोग्य, कधी नातं आणि कधी माणूस.





चर्चेतील मुद्दा

# ‘स्कूल ठीक करो’ मोहिमेची दिशा काय असावी?

**शाळेची स्वच्छता विद्यार्थी करत आहेत, त्यांच्या हातात झाडू आहेत, हे पाहून ‘कॉकरोच जनता पार्टी’चे प्रमुख अभिजीत दिपके यांनी शिक्षकांना सुनावल्याचा व्हिडिओ पाहण्यात आला. विद्यार्थ्यांनी शाळेची स्वच्छता करायची नसेल, तर मग ही कामे कोणी करावीत, याचे उत्तर दिपके यांनी शिक्षकांना सुनावण्यापूर्वी द्यायला हवे होते.**

**भाऊ चासकर,** अकोला

स्वच्छतेचे महत्त्व समजून घेऊन अंगी बाणवण्याच्या उद्देशाने मुलांनी स्वतःचा वर्ग किंवा परिसर स्वच्छ ठेवण्यात सहभागी होणे, यात गैर काहीच नाही. उलट त्यातून श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन आणि सामूहिक जबाबदारीची भावना विकसित होते. त्यामुळे एखादा व्हिडिओ पाहून शिक्षकांना दोष देण्याआधी त्या शाळेत स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध आहे का, हा प्रश्न विचारला पाहिजे. भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. खरं म्हणजे कोणीही उठावे आणि शिक्षकांना झापावे, टीका करावी. हे सोपे आहे. कारण शिक्षक सॉफ्ट टार्गेट असतात. पण शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त वाढत्या प्रशासकीय आणि अशैक्षणिक कामाच्या जबाबदाऱ्यांमधून मुक्त करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी करणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण सवाल विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आहे! त्यासाठी शिक्षणविरोधी धोरणांची चिकित्सा केली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या हातात झाडू दिसल्यावर संताप व्यक्त करण्यापेक्षा त्या मुलांच्या हातात झाडू देण्याची गरजच पडू नये, अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी आवाज उठवणे, आग्रह धरणे हे अधिक महत्त्वाचे.

‘स्कूल ठीक करो’ या मोहिमेचे आम्ही शिक्षक स्वागतच करतो. या मोहिमेमुळे देशातील सार्वत्रिक शालेय शिक्षण हा चर्चाविश्वाचा भाग बनला आहे. किंबहुना, तो चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आपले कार्यकर्ते जेव्हा शाळांमध्ये जातात, तेव्हा त्यांनी भौतिक सोयी-सुविधा कितपत पुरेशा आहेत आणि त्यांचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष किती उपयोग होतो, याचाही विचार करायला हवा. तसेच, विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना कोणते प्रश्न, कसे आणि कोणत्या पद्धतीने

विचारायचे, याचे भानही निश्चितपणे ठेवायला हवे. काही शिक्षक कामचुकार आहेत. त्यांची बाजू कोणी घेणार नाही. त्यांना शासन झाले पाहिजे. मात्र मुलांसमोर शिक्षकांना बोलणे, सोशल प्लॅटफॉर्मवर ठेवणे आणि त्यातून गोष्टी व्हायरल होणे, यामुळे शिक्षकांबद्दल मुलांच्या मनात अनादर निर्माण होणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल.

'कॉकरोच जनता पार्टी' आणि अभिजित दिपके यांना शाळा चांगल्या असल्या पाहिजेत, असे वाटते, ही निश्चितच स्वागतार्ह आणि आश्वासक बाब आहे. विशेषतः वंचित घटकातील मुलांसाठी उत्तम शैक्षणिक वातावरण आवश्यक आहे. शाळेत विद्यार्थ्यांसाठी व्यवस्थित आसनव्यवस्था, खेळती हवा, पुरेसा सूर्यप्रकाश, स्वच्छ व रंगरंगोटी केलेली इमारत, शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छ आणि वापरण्यायोग्य स्वच्छतागृहे, खेळाचे मैदान, किचन शेड अशा मूलभूत सुविधा असायलाच हव्यात. मात्र, या सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. शिक्षकांची भूमिका या सुविधा उभारण्यापेक्षा त्या वातावरणात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची आहे. खरोखरच 'स्कूल ठीक करो' ही मोहीम मनापासून पुढे न्यायची असेल, तर शाळेत जाऊन केवळ उणिवा दाखवण्यापेक्षा त्या उणिवांची कारणे शोधून त्यावर धोरणात्मक उपायांवरही तातडीने काम करायला लागेल.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त केले पाहिजे. शिक्षकांचा वेळ शिकवण्याऐवजी विविध प्रशासकीय, सर्वेक्षण, माहिती संकलन, निवडणूक, जनगणना, SIR, ऑनलाइन माहिती भरणे अशा कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर जातो. परिणामी अध्यापनाचे वेळापत्रक बाधित होते. शाळा सुधारायची असेल, तर शिक्षकांना केवळ 'शिकवू द्या', हा आग्रह शासनाकडे धरला पाहिजे. शिक्षकांचा अध्यापनाचा वेळ वाचवणे ही शाळा सुधारण्याची पहिली पायरी आहे. नवीन संचमान्यतेच्या शासन निर्णयाने मुलांचे शिक्षक काढून घेतले आहेत. पदांची संख्या कमी केली आहे. हे धोरण अत्यंत अन्यायकारक आहे. ते बदलण्याचा आग्रह वारंवार धरला आहे. हा शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधातला असंविधानिक निर्णय शासन निर्णय मागे घेत नाही.

शाळांमधील प्रशासकीय कामांसाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अशैक्षणिक कामांमध्ये शिक्षकांचा प्रचंड वेळ खर्च होतो. केंद्र पातळीवर डेटा एन्ट्री ऑपरेटर किंवा प्रशासकीय सहाय्यक उपलब्ध करून दिले, तर शिक्षकांचा बराच वेळ वाचू शकतो. बीएलओसारखी प्रशासकीय जबाबदारी, माहिती संकलन आणि ऑनलाइन डेटा व्यवस्थापनाची कामे स्वतंत्र यंत्रणेकडे दिली पाहिजेत. शिक्षकांचा संगणकावरील वेळ कमी करून तो विद्यार्थ्यांसाठी वापरता आला पाहिजे. बेरोजगार तरुणांना रोजगारही मिळेल.

सार्वजनिक शिक्षणासाठी पुरेसा आर्थिक निधी उपलब्ध करून देणे हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च वाढवून तो सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ६ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट अधोरेखित केले आहे. प्रत्यक्षात शिक्षणासाठी होणारा सार्वजनिक खर्च त्यापेक्षा खूपच कमी आहे. निधी वाढल्याशिवाय शाळांना प्रयोगशाळा, वाचनालये, क्रीडा सुविधा, डिजिटल साधने आणि इतर भौतिक सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देणे कठीण आहे.

आज अनेक शासकीय शाळांना साधे वीजबिल भरण्यासाठीही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. शेकडो शाळांचे वीज कनेक्शन तोडले आहेत. ग्रामपंचायतींकडून निधी मिळण्यात अडचणी येतात आणि स्थानिक पातळीवरील विविध ताणतणावांचा त्यावर परिणाम होतो. शासकीय शाळा नफा कमावणाऱ्या संस्था नाहीत. त्यामुळे त्यांच्या मूलभूत खर्चासाठी शासनाने स्पष्ट आणि स्वतंत्र आर्थिक व्यवस्था उभी करायला हवी. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली पाहिजे.

प्रधानमंत्री पोषण आहार योजनेच्या व्यवस्थापनातही शिक्षकांचा मोठा वेळ आणि ऊर्जा खर्च होते. पोषण आहार हा विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा कार्यक्रम आहे. मात्र, त्याची व्यवस्थापनात्मक जबाबदारी शिक्षकांवर टाकणे योग्य नाही. त्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ आणि सक्षम यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रश्न केवळ शासकीय शाळांपुरता मर्यादित नाही. नामवंत शाळांमध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातून अनुसूचित जमातीतील मुले शिकायला येतात. त्यासाठी आदिवासी विकास विभाग प्रत्येक मुलाच्या निवास आणि शिक्षण व्यवस्थेसाठी वार्षिक ७०,००० रुपये संबंधित खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना उपलब्ध करून देतो. तसेच आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के प्रवेशाच्या माध्यमातून इंग्रजी

## ‘रोगापेक्षा इलाज भयंकर’

मूलभूत प्रश्नांवर काम न करता केवळ शाळेत जाऊन उणिवांचे व्हिडिओ बनवले, ते सोशल मीडियावर व्हायरल केले आणि त्यातून प्रसिद्धी मिळवली, तर शाळा सुधारणार नाहीत. शाळेतले विदारक चित्र जगासमोर येईल. त्याकडे लक्ष वेधून घेतले पाहिजेच. मात्र, यातला धोका असा आहे की शिक्षकांची आणि शासकीय शाळांची बदनामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आधीच निर्माण झालेली शासकीय शाळांविषयीची अविश्वासाची भावना आणखी वाढू शकते. गेल्या काही दशकांत सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता कमी करण्याची जी प्रक्रिया विविध कारणांनी सुरू आहे, तिला नकळत हातभार लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे ‘रोगापेक्षा इलाज भयंकर’ अशी अवस्था निर्माण होता कामा नये.

## शाळांची प्रतिमा खराब होण्याची शक्यता

‘स्कूल ठीक करो’ मोहिमेचे स्वरूप शासकीय शाळांची बदनामी करणाऱ्या मोहिमेसारखे होणे अजिबात अपेक्षित नाही. शाळेत जाणारे कार्यकर्ते संयमी, संवेदनशील आणि वस्तुस्थिती समजून घेणारे असायला हवेत. शिक्षकांकडूनही चुका होत असतील, तर त्यावर जरूर प्रश्न उपस्थित केलेच पाहिजेत. परंतु संपूर्ण शिक्षक समुदायाला संशयाच्या भोवऱ्यात आणून उभे करणे किंवा अपमानाच्या नजरेने पाहणे योग्य नाही. एखाद्या ठिकाणी कार्यकर्त्यांकडून शिक्षकांशी आक्रमक किंवा मारामारीपर्यंत जाणारे वर्तन झाले असेल, तर अशा घटनांपासून धडा घेण्याची गरज आहे. शाळेतील एखादे बंद पडलेले किंवा वापरात नसलेले स्वच्छतागृह दाखवून ‘हीच सध्याच्या शाळेतील स्वच्छतागृहांची अवस्था आहे’, असा सार्वत्रिक निष्कर्ष काढणेही योग्य नाही. अशा पद्धतीच्या चित्रणामुळे शाळेतील वास्तविक परिस्थिती समजून घेण्याऐवजी शासकीय शाळांची प्रतिमा खराब होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे कार्यकर्त्यांनी शाळेत जाताना टीका करण्यापेक्षा वस्तुस्थिती समजून घेण्याची आणि सुधारणा सुचवण्याची भूमिका ठेवायला हवी.

---

माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यासाठी शासन अनुदान देते.

या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या निवास सुविधा, जेवणाचा दर्जा, वसतिगृहांतील परिस्थिती आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा यांचे सातत्याने शैक्षणिक ऑडिट करण्याची मागणी होत आलेली आहे. मात्र, त्याकडे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या शाळांमध्ये जाऊन या मुद्द्यांकडेही गांभीर्याने लक्ष वेधून ते वास्तव जगासमोर मांडले पाहिजे, अशी अपेक्षा आहे.

इंग्रजी माध्यमाच्या किंवा खासगी शाळांमध्ये जाणाऱ्या मुलांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा समान अधिकार आहे. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेकडे पाहताना सरकारी विरुद्ध खासगी किंवा मराठी विरुद्ध इंग्रजी अशी विभागणी न करता प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळेल, यासाठी व्यापक भूमिका घ्यायला हवी. खासगी शाळा अधिकाऱ्यांना गेटमधून आत शिरू देत नाहीत. त्यांची पालकांशी असलेली मुजोरी, दादागिरी खपवून घ्यायला नको.

शाळा सुधारायच्या असतील, तर शाळेतील शिक्षकांना दोषीच्या पिंजऱ्यात उभे करून नव्हे, तर त्यांना आवश्यक साधने, वेळ, मनुष्यबळ आणि आर्थिक संसाधने उपलब्ध करून देऊन सुधारणा घडवावी लागेल. शाळा ही केवळ इमारत थोडीच असते? ती शिक्षक, विद्यार्थी, पालक, शासन आणि समाज यांच्या सहभागातून उभी राहणारी सार्वजनिक संस्था असते. म्हणून ‘स्कूल ठीक करो’ ही मोहीम केवळ शाळांची तपासणी करणारी किंवा व्हिडिओ बनवणारी न राहता, शाळांना सक्षम करणारी, शिक्षकांना शिकवण्यासाठी मोकळे करणारी आणि सार्वजनिक शिक्षणव्यवस्था मजबूत करणारी मोहीम झाली, तर तिचे खरे स्वागत केले पाहिजे.

# परिस्थितीचे ‘जू’ खांद्यावर पेलणाऱ्या माऊलीची कहाणी

**नवीन पुस्तक**




**एकंदर परिस्थिती आणि गरीबीचा बाऊ न करता नियतीशी लढा देऊन खंबीरपणे संसाराच्या गाड्याचे जू खांद्यावर घेऊन न हरता बाई जिंकते. कितीही कठीण परिस्थितीत बाई कधीच हरत नसते हे सिद्ध करणारी कादंबरी हे शिर्षक खरे करुन दाखवते. प्रत्येक वाचकाने वाचावी अशी ही कादंबरी खिळवून ठेवणारी आहे.**

लेखकाच्या जन्मापासून ते दहावीपर्यंतचा सर्व प्रवास मनाला अस्वस्थ करुन गेला. चार मुली व एका मुलाचे संगोपन करताना इंदुआईची झुंज वाचून नकळत अश्रू आवरणे कठीण झाले. एकमेव आधार अंबरमामा आपुलकीचा चैतन्याचा जिव्हाळा वाटला.चार मुली म्हणजे चार दिशा होऊन आधाराचे खांब बनून झगडत राहिल्या. प्रेमळ साथ देणाऱ्या इंदुआईच्या काही जिवाभावाच्या मैत्रिणी यांनी नात्यांच्या पलिकडे साथ दिली. अपवाद वगळता सर्व संघर्ष हा आपल्याच माणसांशी लढण्यात गेला. कुठलाच सण, उत्सव आनंदात गेला नाही. यात्रेतील खेळणी म्हणून ट्रॅक्टर घेता आला नाही. खेळणीकडे बघून समाधान मानावे लागले. वाचताना याचे शल्य वाटत राहिले. परिस्थितीने इंदुआईला खंबीर बनवले. अगणित कष्ट उपसून, वेळप्रसंगी उपाशीपोटी राहून चार मुलींचे लग्न करणे सोपे काम नव्हते. परंतु जिद्द, चिकाटी, मेहनत आणि लेकरांसाठी गरीबीशी लढण्याचे आत्मबळ परिस्थिती देत गेली. प्रत्येक आलेल्या संकटांनी परीक्षा घेतली. जीवघेण्या प्रसंगातून केवळ इच्छाशक्ती आणि एका आईचा संघर्ष वाचताना इंदूआई मला मदर इंडिया वाटू लागली...

परिस्थिती कितीही बिकट असो, परंतु तिलाही जिद्दीपुढे कधी हार मानावीच लागते. इंदुआईला परिस्थितीने झुंजविले पण या मातेने हार मानली नाही. कितीवेळा मोडलेले घर उभे केले. आपल्या मुलींवर संस्कार केले. मुलाला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले म्हणून आज लेखक प्राध्यापक होऊन नावारुपाला आले. याचे सर्व श्रेय इंदुआईला जाते. कादंबरी वाचून झाल्यावर काही प्रश्न अनुत्तरित राहिले. दहावी झाल्यानंतरचा ते नोकरी लागल्यापर्यंतचा प्रवास आणि इंदुआईचा थांबलेला संघर्ष, चार बहिणींचे स्वप्न व देवळ्याचे दाजी आणि अंबरमामा यांच्या साक्षीने सुखाचे चांदणे दारी आलेले पहायला, वाचायला मिळाले असते तर आनंद व्दिगुणित झाला असता...

या कादंबरीतील परिस्थिती ही जागतिकीकरणाच्या पुर्वीची असल्याने गावाचे सामाजिक, सांस्कृतिक,वर्णन व ग्रामीण बोलीभाषा यांचा वापर हा काळ सुसंगत आहे. भौगोलिक संदर्भ व वर्णन वाचून प्रसंग उभे करण्याचे लेखन कौशल्य संवेदनशील आहे. संतू, झिंग्या, पग्या, गण्या, नित्या व दिवड्या ते दहावीचे मित्र या बालमित्रांची मैत्री ही निखळ वाहत्या झऱ्यासारखी जागोजागी प्रवाहित करते. मित्रांच्या संगतीत काही क्षण दुःख विसरुन आनंद देतात. हे सर्व वाचून मला माझा भूतकाळ पुढे उभा राहिला. माझेही बालपण असेच गरीबीची गेले. वडिल बालपणीच वारले. आई आणि बहिणीने मोलमजुरी करुन शिकवले. मोठे बंधू वडिलांसमान प्रेमळ स्वभावाचे होते. ही परिस्थिती मी भोगल्याने माझा संघर्षकाळ आठवला. लेखकाने प्रांजळपणे कुठेही आडपडदा न ठेवता,जे घडले ते सत्य मांडले आहे.

**सारंगधर काळे,** जालना

# ग्राफिक्स



E-20 इथेनॉल मिश्रण
वापरणारे देश
E20
इथेनॉल मिश्रण हाच योग्य पर्याय
देश
प्रचलित मिश्रण
ब्राझील
E20 पेक्षा जास्त तसेच उच्च मिश्रणे
(E27 पर्यंत सरासरी)
अमेरिका
E10
(सर्वसाधारण) E15, E85 (Flex-Fuel साठी)
भारत
E20
(सरासरी सरासरी) E85 (Flex-Fuel साठी)
थायलंड
E10, E20
आणि उच्च मिश्रणे
कॅनडा
E10
(प्रामुख्याने)
अर्जेंटिना
E12
(च्याआसपास सरासरी)
कोलंबिया
E10
पॅराग्वे
E25
(पर्यंत मिश्रणे)




E-20 ची दुसरी बाजू
समजून घ्या!
मका, ऊस, तांदूळ
विक्रमी उत्पादनामुळे
शेतकऱ्यांना फायदा
310 लाख टन
कच्च्या तेलाची
आयात वाचली
त्यामुळे पेट्रोल, डिझेल
तर स्थिर व
महागाई नियंत्रणात
पर्यावरण अनुकूलता
कार्बन डायऑक्साइड
उत्सर्जन कमी
E-20
E-20
20% Ethanol
80% Petrol
ऊर्जा स्वावलंबन, शेतकऱ्यांचा सन्मान,
स्वच्छ पर्यावरण... हेच E-20 चे महान!




भारतीय UPI
आता जगभरात!
१० देशांमध्ये सहज, जलद आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट
UPI स्वीकारणारे १० देश
1 भूतान (पहिली यूपीआय स्वीकारणारी सोय)
2 संयुक्त अरब अमिरात (UAE)
3 सिंगापूर
4 फ्रांस (युरोपीय देश जिथे आयफेल टॉवरवरही सुविधा)
5 नेपाळ
6 श्रीलंका
7 मॉरिशस
8 कतार
9 कंबोडिया
10 ग्रीस
UPI
UNIFIED PAYMENTS INTERFACE
क्यूआर स्कॅन करा
आणि पेमेंट करा
FAST • EASY • SECURE
POWERED BY
NPCI
100%
सुरक्षित
डिजिटल पेमेंट
UPI
ACCEPTED HERE
परदेशात UPI वापरताना घ्यायची काळजी
परदेशात जाण्यापूर्वी UPI ॲपमध्ये आंतरराष्ट्रीय पेमेंट (UPI INTERNATIONAL) हा पर्याय सुरू (ENABLE) करा.
NIPL
UPI
सर्व दुकानांमध्ये ही सुविधा नसू शकते, त्यामुळे स्थानिक मर्चंटकडे NIPL किंवा UPI चा लोगो तपासा.
व्यवहारांवर लागू असणारे चलन रूपांतरण शुल्क (FOREX/BANK CHARGES) लागू होऊ शकतात.
UPI मुळे जगभरात तुमचे पेमेंट झाले अधिक सोपे, जलद आणि सुरक्षित!




जगातील नाणी
विविध देशांची नाणी, विविध संस्कृतीची ओळख
@mmcnewsnetwork
अमेरिका
डॉलर
(१ डॉलर)
जपान
येन
(१ येन)
स्विट्झर्लंड
फ्रँक
(१ फ्रँक)
युरोपियन संघ
युरो
(१ युरो)
चीन
युआन
(१ युआन)
रशिया
रुबल
(१ रुबल)
युनायटेड किंगडम
पाउंड
(१ पाऊंड)
दक्षिण कोरिया
वॉन
(१ वॉन)
ब्राझील
रिअल
(१ रिअल)
कॅनडा
डॉलर
(१ डॉलर)
भारत
रुपया
(१ रुपया)
मेक्सिको
पेसो
(१ पेसो)
ऑस्ट्रेलिया
डॉलर
(१ डॉलर)
इंडोनेशिया
रुपिया
(१ रुपिया)
तुर्की
लीरा
(१ लीरा)
“ नाणे लहान असते, पण त्यामागची कहाणी मोठी असते. ”


जगभरात
सर्वात वेगाने
$1 बिलियन पेक्षा जास्त कमाई
करणारे 10 चित्रपट!
1 अव्हेंजर्स: एंडगेम (2019) 5 दिवस
2 स्पायडर-मॅन: ब्रँड न्यू डे (2026) 6 दिवस
3 अव्हेंजर्स: इन्फिनिटी वॉर (2018) 11 दिवस
4 ने झा 2 (2025) 12 दिवस
5 स्टार वॉर्स: द फोर्स अवेकन्स (2015) 12 दिवस
6 स्पायडर-मॅन: नो वे होम (2021) 12 दिवस
7 ज्युरासिक वर्ल्ड (2015) 13 दिवस
8 अवतार: द वे ऑफ वॉटर (2022) 14 दिवस
9 झूटोपिया 2 (2025) 17 दिवस
10 फ्युरियस 7 (2015) 17 दिवस


जुलै 2026 मधील
भारतातील टॉप 5 EV
दुचाकी विक्री
TVS टीव्हीएस 52,130 युनिट्स
BAJAJ बजाज 43,229 युनिट्स
ATHER एथर 28,602 युनिट्स
VIDA विडा 33,909 कोटी
OLA ELECTRIC ओला 13,113 युनिट्स


अंबानी विरुद्ध अदानी
नेटवर्थ
मुकेश अंबानी
गौतम अदानी
₹1.5 लाख कोटी 2017 ₹37,700 कोटी
₹2.7 लाख कोटी 2020 ₹65,800 कोटी
₹6.9 लाख कोटी 2023 ₹3.8 लाख कोटी
₹8.7 लाख कोटी 2026 ₹8.1 लाख कोटी


आपलं शहर, आपली बातमी
पाणी पिण्यासाठी
कोणती बाटली निवडावी?
चांगले पर्याय
स्टेनलेस स्टीलची बाटली
टिकाऊ आणि मजबूत
गंज लागत नाही
स्वच्छ करायला सोपी
सर्वोत्तम पर्याय
काचेची बाटली
रसायनमुक्त
पाणी शुद्ध राहते
चव बदलत नाही
उत्तम पर्याय
तांब्याची बाटली (मर्यादित वापर)
प्रतिजैविक गुणधर्म
ताजेपणा राखते
मर्यादित व वापर बदलत ठेवा
मर्यादित वापर
BPA-Free प्लास्टिक बाटली
BPA-Free आणि सुरक्षित
हलकी व वाहून नेण्यास सोपी
गरम पाणी ठेवू नये
काळजीपूर्वक वापर
टाळाव्यात अशा बाटल्या
सिंगल-यूज प्लास्टिक (PET) बाटली
पुन्हा वापरू नका
उष्णतेमुळे हानिकारक रसायने मिसळू शकतात
तुटे/खराब/जुनी प्लास्टिक बाटली
जंतू वाढण्याची शक्यता
स्वच्छ करणे कठीण
निकृष्ट दर्जाची ॲल्युमिनियम बाटली
धातू पाण्यात मिसळण्याची शक्यता
दैनिक वापरासाठी योग्य नाही
गंजलेली/जुनी धातूची बाटली
पाण्याची गुणवत्ता खराब होते
आरोग्यासाठी हानिकारक
लक्षात ठेवा
बाटली कोणतीही असो, नियमित स्वच्छता करा.
बाटली नियमित बदलत वा स्वच्छ ठेवा.
नेहमी ताजे आणि स्वच्छ पाणी प्या.

# राजकारण आणि पांडुरंग



कविता

*महाराष्ट्रातली सगळी गावं तुझीच आहेत,*
*तू अर्ज भरून पाहावं...*
*मला वाटतं, पांडुरंगा, तू यंदा निवडणुकीला उभं राहावं!*
*मग ना पावसातल्या सभा, ना प्रचाराचा घाम...*
*तुझे स्टार प्रचारक, देवा—ज्ञानबा, तुकाराम!*
*प्रचाराच्या जाहिरातीत यांच्या ओव्या कानी पडतील...*
*बॅनर बघून वीट येण्यापेक्षा हात जोडले जातील...*
*सगळं सुखाचं होईल, तेव्हा*
*विपरीत काही घडणार नाही, पांडुरंगा...*
*आणि तू सगळ्यांचा असल्यामुळे*
*एकही मत जात पाहून पडणार नाही...*
*अजून तरी, पांडुरंगा, तुझा*
*कुणीच विरोधक नसल्यानं सगळ्यांना बरंच वाटंल...*
*अन् मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण,*
*हे कोडंही लवकर सुटंल...*
*पहिली टर्म असली तरी, देवा, बिनविरोध येशील...*
*आणि मुख्य म्हणजे भल्याभल्यांना*
*तुझ्या मंत्रिमंडळातही घेशील...*
*सगळ्यांत मोठा निर्णय, पांडुरंगा, असा घे...*
*कायद्यासोबत गृहखातं*
*छत्रपती शिवाजी महाराजांना दे!*
*मग काय टाप, देवा!*
*कोण कायदा हातात घेईल?*
*अरे, एका नजरेत अख्खा*
*महाराष्ट्र सुतासारखा सरळ होईल!*
*लाडक्या भावांवरचं समान प्रेम*
*जिचा आदर्श म्हणून पाहावं...*
*त्या मुक्ताईकडे महिला व बालविकास खातं जावं!*
*आणि साक्षरतेचे, विठ्ठला, काय दिवस येतील...*
*बुद्धीला वैभव आणणारे आमचे*
*ज्ञानदेव शिक्षणमंत्री होतील!*
*अरे, पाणी ज्यांच्या गाथेला तारून स्वतः खाली बुडालं...*
*जे सदेह आले स्वर्गात आणि तू दार उघडलं,*
*त्या तुकोबांच्या हाती दे हिशेबाच्या वह्या*

आणि अर्थमंत्री म्हणून घे ताबडतोब त्यांच्या सह्या!
एकदम झाला आवाज हो... लखलख वीज कडाडली!
वीटेवरची सावळी माऊली माझ्यावरती चिडली...
काय लावली केव्हापासूनची तुझी ही बडबड आहे?
पांडुरंग म्हणाला...
"काय लावली केव्हापासूनची तुझी ही बडबड आहे?
हे सगळं होणं आता अशक्य आणि अवघड आहे!
या थोरांना मंत्री करून मला सीएम करतोस हो रे...
राजकारणात त्यांच्या नावाचा होतो तेवढा वापर पुरे!"
राष्ट्राच्या भल्यासाठी बोलतोयस म्हणून केव्हाचा ऐकतोय...
पण ऐक, आता एक उपाय मी मन लावून सांगतोय...
माऊलीच्या रूपातला विठ्ठल बापासारखा वागला,
अन् जबाबदारीनं राष्ट्रासाठी पुढं बोलू लागला...
मला म्हणाला,
"गाथा, ज्ञानेश्वरी, शिवचरित्र तुम्ही कोणी वाचता?
अन् मग कसं काय रे, त्या जयंत्यांना
तुम्ही डीजे लावून नाचता?"
या सगळ्यांना तुम्ही सोयीनुसार जातीमध्ये वाटलंत...
डोक्यावरती तर घेतलंत, पण डोक्यात नाही घातलं!
प्रत्येकात तुकाराम, शिवाजी आहेत...
जर विचारांचा घेतला वसा,
सुराज्यासाठीच काम करा,
मग कुणीही खुर्चीत बसा!
आणि कर्तृत्वाची वेळ आहे,
आता नको नुसती बडबड...
आधी मतदानाला वारी समजून
तू घराबाहेर पड!
आम्ही सगळे पाठिशी आहोत,
तुम्ही खुशाल राहा...
अरे, समोर महाराष्ट्र उभा आहे...
त्याच्यात पांडुरंग पाहा!

**संकर्षण कऱ्हाडे,**
**अभिनेते, कवी, परभणी**



# संपले कुठे महाभारत...

आजही प्रत्येक मनात
जिवंत आहे महाभारत,
कर्तव्यात जुंपलाय अर्जुन,
कृष्णाची साथ शोधतंय
मनातलं महाभारत...

नात्यांच्या रणांगणात,
तर कधी निर्णयांच्या द्वंद्वात,
कधी परक्यांविरुद्ध,
तर कधी रक्ताच्याच विरोधात,
गुंतलंय महाभारत...

युद्ध आजही तेच,
लढाई ही तीच आहे,
बदललेत फक्त चेहरे,
इथे रक्तातच मुरलंय
महाभारत...

आजचा अर्जुन एकटाच लढतोय,
कृष्णाला शोधणंच अवघड झालं,
प्रत्येक मनात चक्रव्यूह आहेच,
जिंकण्यासाठी सगळंच चाललंय...

बहुतेक म्हणूनच...
संपलं कुठे महाभारत?
फक्त पात्रं बदलली,
युग बदललं,
मनातली खळबळ
आजही तीच आहे...
मनातल्या महाभारताला
आजही...
एका सारथ्याची भूक आहे.

**- वैशाली देवरे**




# रोबोटिक्समध्ये करिअर भविष्यातील तंत्रज्ञान घडवण्याची संधी

**मुलांनो, आजचा काळ फक्त मोबाईल आणि कॉम्प्युटर वापरण्यापुरता राहिलेला नाही. आता मशीन स्वतःहून काम कसे करेल, कारखान्यांमध्ये रोबोटच्या मदतीने उत्पादन कसे वाढेल, रुग्णालयांमध्ये तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर कसा होईल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने यंत्रांना अधिक सक्षम कसे बनवता येईल, यावर जगभरात मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. सायन्स, टेक्नॉलॉजी, प्रोग्रॅमिंग आणि नवीन गोष्टी तयार करण्याची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स (Robotics) हे भविष्यातील उत्तम करिअर क्षेत्र ठरू शकते.**

करिअर

**डॉ. स्वाती गानू,** शैक्षणिक समुपदेशक, मुंबई

या क्षेत्रामध्ये Mechanical Engineering, Electronics, Electrical Engineering, Computer Science, Artificial Intelligence आणि Programming या अनेक शाखांचा संगम होतो. त्यामुळे रोबोटिक्स म्हणजे केवळ एखादा रोबोट तयार करणे नाही; तर मशीनला विशिष्ट परिस्थिती ओळखण्याची, माहितीवर प्रक्रिया करण्याची आणि त्यानुसार काम करण्याची क्षमता देणे होय. आज औद्योगिक कारखाने, आरोग्यसेवा, शेती, संरक्षण, अंतराळ संशोधन, ऑटोमोबाईल, लॉजिस्टिक्स आणि सेवा क्षेत्रात रोबोटिक्सचा वापर वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात कौशल्याधारित करिअरच्या संधी भविष्यात अधिक विस्तारण्याची शक्यता आहे.

**बारावीनंतर सुरुवात कुठून करायची?**

रोबोटिक्समध्ये करिअर करायचे असेल, तर अकरावी-बारावीत Physics, Chemistry आणि Mathematics (PCM) हा विषयसमूह घेणे फायदेशीर ठरते आणि अनेक अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असते.

बारावीत चांगले गुण मिळवणे महत्त्वाचे आहे. मात्र, अभियांत्रिकी प्रवेशामध्ये केवळ बारावीच्या टक्केवारीपेक्षा संबंधित प्रवेश परीक्षा आणि गुणवत्ता यादीचीही महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बारावीच्या अभ्यासाबरोबरच प्रवेश परीक्षेची तयारी करणे आवश्यक आहे.

**कोणते अभ्यासक्रम निवडावेत?**

रोबोटिक्समध्ये जाण्यासाठी फक्त B.Tech. Robotics हीच एक शाखा आहे, असे समजणे चुकीचे ठरेल. खालील शाखांमधूनही रोबोटिक्स क्षेत्रात करिअर

करता येते-

Robotics and Artificial Intelligence
Mechatronics Engineering
Mechanical Engineering
Electronics and Telecommunication Engineering
Electrical Engineering
Computer Science Engineering
Artificial Intelligence and Machine Learning
Automation and Control Systems

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी COEP Technological University, पुणे येथे B.Tech. Robotics and Artificial Intelligence सारखा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. याशिवाय IIT, NIT, IIIT आणि इतर नामांकित अभियांत्रिकी संस्थांमधील Mechanical, Electronics, Computer Science, Artificial Intelligence आणि Automationशी संबंधित शाखांमधूनही रोबोटिक्स क्षेत्रात प्रवेश करता येतो.




## कोणत्या प्रवेश परीक्षा द्याव्या?

महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेशासाठी MHT-CET हा महत्त्वाचा मार्ग आहे. राष्ट्रीय स्तरावरील अनेक तांत्रिक संस्थांमधील प्रवेशासाठी JEE Main आवश्यक असते. IITमध्ये प्रवेशासाठी JEE Mainनंतर JEE Advanced ही पुढील महत्त्वाची परीक्षा असते. विद्यार्थ्यांनी कोणत्या संस्थेत आणि कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा आहे, यानुसार प्रवेश परीक्षा आणि पात्रता निकष तपासावेत.

## रोबोटिक्स करिअर रोडमॅप

१०वी ११ वी - १२ वी PCM MHT-CET / JEE Main अभियांत्रिकीची योग्य शाखा Programming + Electronics + Robotics Projects Internship Specialisation Job / Higher Studies

मात्र, हा प्रवास केवळ पदवी मिळवण्यापुरता मर्यादित ठेवू नये. रोबोटिक्समध्ये यशस्वी होण्यासाठी कॉलेजमध्ये असतानाच प्रत्यक्ष काम करण्याची सवय महत्त्वाची ठरते.

## विद्यार्थ्यांनी खालील कौशल्यांवर काम करावे-

Python किंवा C/C++ Programming
Sensors आणि Microcontrollers
Embedded Systems
Basic Electronics
Arduino आणि इतर Development Platforms
Artificial Intelligence आणि Machine Learning
Computer Vision
Automation
Robot Programming
CAD आणि Mechanical Design

## कोणत्या नोकऱ्या मिळू शकतात?

रोबोटिक्स केल्यानंतर फक्त 'Robot Engineer' हेच एक करिअर उपलब्ध असते, असे नाही. संबंधित कौशल्यांनुसार विविध क्षेत्रांत संधी उपलब्ध होऊ शकतात.

उदाहरणार्थ-

Robotics Engineer, Automation Engineer, Mechatronics Engineer, Embedded Systems Engineer, Control Systems Engineer

AI Engineer, Machine Learning Engineer, Computer Vision Engineer, Industrial Automation Engineer, Robotics Software Developer, Research and Development Engineer, Autonomous Systems Engineer, Product Design Engineer, ऑटोमोबाईल उद्योग, उत्पादन क्षेत्र, औद्योगिक ऑटोमेशन, वैद्यकीय उपकरणे, ड्रोन आणि स्वयंचलित यंत्रणा, वेअरहाऊस आणि लॉजिस्टिक्स, संरक्षण क्षेत्र तसेच संशोधन संस्थांमध्ये संबंधित कौशल्यांच्या आधारे संधी उपलब्ध होऊ शकतात.






# शेणखताची कमतरता भरून काढणारे ‘हिरवे सोने’!

**शेतीच्या उत्पादनक्षमतेचा खरा आधार रासायनिक खतांच्या पोत्यांत नसून जमिनीच्या जिवंतपणात आहे. मातीमध्ये पुरेसे सेंद्रिय द्रव्य, सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीव आणि आवश्यक अन्नद्रव्यांचे संतुलन असेल तरच पिकांची वाढ जोमदार होते. अलीकडच्या काळात शेतीत शेणखताची उपलब्धता कमी होत चालली आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात चांगले कुजलेले शेणखत उपलब्ध होत नाही.अशा परिस्थितीत हिरवळीचे खत म्हणजे शेतकऱ्यांसाठी निसर्गाने दिलेले ‘हिरवे सोने’ ठरू शकते.**

**विलास जाधव,** ऊस विकास अधिकारी,

**हर्षल पाटील,** सहायक ऊस विकास अधिकारी,
क्रांती साखर कारखाना, कुंडल

धैंचा, ताग, चवळी, मूग यांसारख्या पिकांची हिरवी पाने, खोडे आणि मुळे विशिष्ट अवस्थेत जमिनीत गाडून त्यांचे कुजणारे सेंद्रिय द्रव्य पुढील पिकासाठी अन्नद्रव्यांचा स्रोत बनविणे म्हणजे हिरवळीचे खत. विशेषतः कडधान्यवर्गीय हिरवळीच्या खतांच्या पिकांच्या मुळांवरील गाठींमधील सूक्ष्मजीव वातावरणातील नत्राचे स्थिरीकरण करून जमिनीच्या सुपीकतेत भर घालतात. ICARनेही धैंचा व तागासारख्या हिरवळीच्या खतांच्या पिकांना जमिनीतील सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता आणि अन्नद्रव्यांचा वापर सुधारण्यासाठी महत्त्व दिले आहे.

### हिरवळीचे खत म्हणजे नेमके काय?

हिरवळीचे खत म्हणजे एखादे पीक धान्य किंवा बाजारातील उत्पादनासाठी न घेता, त्याची हिरवी

## हिरवळीच्या खताचे फायदे

- जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवते.
- जमिनीची सुपीकता आणि उत्पादकता टिकविण्यास मदत करते. वातावरणातील नत्राचे जैविक स्थिरीकरण करते.
- जमिनीची भौतिक रचना सुधारते.
- माती भुसभुशीत करण्यास मदत करते.
- पाणी धारण क्षमता वाढवते. जमिनीतील सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढवते.
- अन्नद्रव्यांची उपलब्धता आणि वापर कार्यक्षमता सुधारते. रासायनिक खतांवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी करण्यास मदत करते.
- जमिनीतील सेंद्रिय पदार्थांची कमतरता भरून काढते. पुढील पिकाच्या मुळांच्या वाढीस अनुकूल वातावरण तयार करते.
- शेणखताची कमतरता असलेल्या शेतकऱ्यांसाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारा सेंद्रिय पर्याय ठरतो.

## नियोजन आवश्यक

- हिरवळीचे खत घेण्यासाठी शेतातील काही कालावधी आणि जमीन त्यासाठी वापरावी लागते. त्यामुळे मुख्य पिकाच्या वेळापत्रकाचे योग्य नियोजन करावे लागते.
- पाण्याची उपलब्धता आवश्यक असते. विशेषतः उन्हाळ्यात हिरवळीचे खताचे पीक घेताना सिंचनाची गरज भासू शकते.
- योग्य वेळी पीक जमिनीत गाडणे महत्त्वाचे आहे. खूप जुने, तंतुमय किंवा पूर्ण वाढलेले पीक जमिनीत मिसळल्यास कुजण्यास अधिक वेळ लागू शकतो. ICARच्या मार्गदर्शनानुसार धैंचा साधारण 35–40 दिवसांचा असताना, फुलोऱ्यापूर्वी जमिनीत मिसळणे योग्य मानले जाते.
- तसेच हिरवळीच्या खतामुळे लगेच मोठ्या प्रमाणात उपलब्ध नत्र मिळते, असा गैरसमज टाळावा. त्यातील अन्नद्रव्ये सेंद्रिय पदार्थांच्या कुजण्याच्या प्रक्रियेतून हळूहळू उपलब्ध होतात.

वाढ योग्य अवस्थेत जमिनीत मिसळून सेंद्रिय खत म्हणून वापरणे. धैंचा आणि ताग ही त्यातील प्रमुख पिके आहेत. धैंचा हे जलद वाढणारे कडधान्यवर्गीय पीक आहे. योग्य परिस्थितीत त्याची भरपूर हिरवी जैवभार निर्मिती होते. ICARच्या कृषी सल्ल्यानुसार धैंचा साधारण 35–40 दिवसांच्या अवस्थेत, फुलोरा येण्यापूर्वी जमिनीत गाडल्यास हिरवळीच्या खताचा चांगला उपयोग होतो.

### एक एकर धैंचा म्हणजे भरपूर सेंद्रिय द्रव्य!

शेतकऱ्यांच्या अनुभवाधारित गणनेनुसार एक एकर धैंच्यापासून सुमारे 80 क्विंटल हिरवळीचे खत मिळू शकते. त्याचा सेंद्रिय द्रव्याच्या दृष्टीने मोठा फायदा होतो. स्थानिक गणनेनुसार एक क्विंटल हिरवळीचे खत साधारण 2.8 क्विंटल शेणखताच्या सेंद्रिय परिणामाशी तुलना करता येते. या प्रमाणानुसार 80 क्विंटल हिरवळीच्या खताचा फायदा सुमारे 224 क्विंटल शेणखताइतका मानला जातो. मात्र ही तुलना मुख्यतः सेंद्रिय द्रव्य आणि जमिनीच्या भौतिक गुणधर्मांच्या दृष्टीने समजून घ्यावी. हिरवळीचे खत आणि शेणखत यांचे अन्नद्रव्यांचे प्रमाण, कुजण्याचा वेग आणि परिणाम यामध्ये फरक असतो. त्यामुळे हिरवळीचे खत हे शेणखताचे अक्षरशः वजनानुसार पर्याय नसून शेणखताची कमतरता भरून काढणारा महत्त्वाचा सेंद्रिय पर्याय आहे.

### जमिनीतील नत्राचा नैसर्गिक स्रोत

हिरवळीच्या खताचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे नत्राची उपलब्धता. धैंच्यासारख्या कडधान्यवर्गीय पिकांच्या मुळांवरील रायझोबियमसारख्या सूक्ष्मजीवांच्या साहाय्याने वातावरणातील नत्राचे जैविक स्थिरीकरण होते. चांगल्या वाढलेल्या धैंच्यापासून साधारण 50 ते 60 किलो नत्र प्रति हेक्टर मिळू शकते, असे ICARच्या अलीकडील मार्गदर्शनात नमूद करण्यात आले आहे. हे प्रमाण साधारण 20–24 किलो नत्र प्रति एकर इतके होते; मात्र प्रत्यक्ष उपलब्ध नत्र हे पिकाची वाढ, जमिनीचा प्रकार, हिरवा जैवभार आणि जमिनीत मिसळण्याची अवस्था यावर अवलंबून बदलते.

शेतकऱ्यांच्या स्थानिक अनुभवात धैंच्यापासून एकरी सुमारे 35 किलो नत्र मिळते, तर तागापासून सुमारे 50

किलो नत्र मिळण्याचे उल्लेख आढळतात. ही आकडेवारी स्थानिक परिस्थितीतील अंदाज म्हणून पाहावी; प्रत्यक्ष नत्र उपलब्धतेसाठी माती परीक्षण आणि पिकाच्या जैवभाराचा विचार करणे अधिक शास्त्रीय ठरेल.

**जमिनीची भुसभुशीतता वाढते**

सतत रासायनिक खतांचा वापर आणि सेंद्रिय पदार्थांचा अपुरा पुरवठा यामुळे जमिनीची रचना बिघडू शकते. हिरवळीचे खत जमिनीत मिसळल्याने सेंद्रिय पदार्थ वाढतात. त्यापासून तयार होणारे ह्युमस जमिनीची रचना सुधारते. भारी जमिनीत हवा व पाण्याचा निचरा सुधारण्यास मदत होते, तर हलक्या जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या आणि क्रियाशीलता वाढण्यासही हिरवळीचे खत मदत करते. ICARने हिरवळीच्या खतामुळे सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता, मातीची रचना आणि पाणी धारण क्षमता सुधारत असल्याचे अधोरेखित केले आहे.

**ऊस पिकासाठी विशेष फायदेशीर**

ऊस हे जमिनीतून मोठ्या प्रमाणात अन्नद्रव्ये घेणारे पीक आहे. त्यामुळे ऊस उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी जमिनीची सुपीकता आणि सेंद्रिय कर्ब कायम राखणे अत्यंत आवश्यक आहे. ऊस लागवडीपूर्वी हिरवळीचे खत घेऊन ते योग्य अवस्थेत जमिनीत गाडल्यास जमिनीत सेंद्रिय पदार्थांची भर पडते. यामुळे ऊसाच्या मुळांच्या वाढीस पोषक वातावरण तयार होण्यास मदत होते. जमिनीतील सूक्ष्मजीव सक्रिय होतात आणि अन्नद्रव्यांचे चक्र अधिक प्रभावी होते. ऊस पिकात हिरवळीचे खत हे रासायनिक खतांना पूर्णपणे पर्याय मानण्यापेक्षा एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग म्हणून वापरणे अधिक योग्य आहे. ICARच्या ऊसविषयक अनुभवांमध्येही धैंच्याचे हिरवळीचे खत, पिकांचे अवशेष आणि इतर सेंद्रिय स्रोत यांच्या वापरातून जमिनीची सुपीकता सुधारण्यावर भर देण्यात आला आहे.

**शेणखत उपलब्ध नसताना हिरवळीचे खत का महत्त्वाचे ?**

पूर्वी प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात जनावरे असायची. त्यामुळे शेणखत सहज उपलब्ध होत असे. आज परिस्थिती बदलली आहे. पशुधन कमी झाले, गोठ्यांची संख्या घटली आणि शेणखताची उपलब्धता कमी झाली. दुसरीकडे शेणखताची मागणी वाढल्याने त्याचा खर्चही वाढला आहे. अशा वेळी शेतकऱ्याने आपल्या शेतातच हिरवळीचे खत तयार करणे हा अत्यंत व्यवहार्य पर्याय ठरतो. वाहतूक खर्च नाही, बाहेरून खत आणण्याची गरज नाही आणि जमिनीला सेंद्रिय पदार्थही मिळतो. शेतातच तयार होणारे हे खत म्हणजे शेतीतील संसाधनांचे पुनर्चक्रण आहे.

**माती जपा, उत्पादन वाढवा!**

आज शेतीसमोर सर्वांत मोठे आव्हान केवळ उत्पादन वाढविण्याचे नाही, तर जमिनीची उत्पादनक्षमता पुढील पिढ्यांसाठी टिकविण्याचे आहे. रासायनिक खते पिकाला अन्नद्रव्ये देतात; मात्र जमिनीला जिवंत ठेवण्यासाठी सेंद्रिय पदार्थांचीही गरज असते. म्हणूनच रासायनिक खते, शेणखत, कंपोस्ट, पिकांचे अवशेष, जैवखते आणि हिरवळीचे खत यांचा समन्वय साधणारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन स्वीकारणे ही काळाची गरज आहे. ICARच्या 2026 मधील विविध शेतकरी उपक्रमांमध्येही हिरवळीचे खत, सेंद्रिय पदार्थ, जैवखते आणि संतुलित रासायनिक खतांचा एकत्रित वापर करून जमिनीचे आरोग्य सुधारण्यावर भर देण्यात आला आहे.

शेतात पेरलेले धैंचे केवळ हिरवे पीक नसते; ते जमिनीत मिसळल्यानंतर सेंद्रिय कर्ब, नत्र, सूक्ष्मजीव आणि सुपीकतेचे नवे चक्र सुरू करणारे नैसर्गिक साधन बनते. शेणखताची उपलब्धता कमी होत असलेल्या आजच्या काळात प्रत्येक शेतकऱ्याने हिरवळीच्या खताचा विचार केवळ 'खताचा पर्याय' म्हणून न करता जमिनीच्या आरोग्याची दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून करणे गरजेचे आहे.

हिरवळीचे खत घेताना योग्य बियाणे, योग्य पेरणीची वेळ, पुरेसा ओलावा आणि योग्य वयात जमिनीत गाडणे या चार बाबी महत्त्वाच्या आहेत. धैंचा पेरल्यानंतर साधारण 35–45 दिवसांच्या कालावधीत, पिकाची वाढ आणि स्थानिक परिस्थिती पाहून, फुलोऱ्यापूर्वी ते जमिनीत मिसळणे उपयुक्त ठरते. ICAR च्या मार्गदर्शनातही धैंचा योग्य अवस्थेत जमिनीत मिसळण्यावर भर दिला आहे.हिरवळीचे खत जमिनीत मिसळताना जमिनीत पुरेसा ओलावा असणेही आवश्यक आहे. त्यामुळे त्याचे कुजणे जलद आणि परिणामकारक होते.


हमारी नई टीम
आई टी और
सोशल मीडिया
पर अब और
बेहतरीन काम करेगी!
नई टीम
आई टी एवं
सोशल मीडिया
प्रभाग
अश्लील
शब्द
भ्रामक
खबरें
हिंदू
मुस्लिम
लांछन
गाली
गलौच
झूठ


तुम्हारी शुगर
बहुत ज्यादा
बढ़ गई है...
डॉ. साब ये बढ़ी हुई
शुगर एथेनॉल वालों को
बेच सकता हूं..?
शरीर में शुगर के प्रभाव
आँख
दिल
किडनी
पैर
स्वस्थ रहो
मस्त रहो
रिपोर्ट
शुगर लेवल
356mg/dl
बहुत ज्यादा
डायबिटीज गाइड
स्वस्थ जीवन
योग और आहार
डॉ. वर्मा


एकदा गाढव व्हायचं ठरवलं की
पाठीवर ओझे लादले जाणार हे गृहीत धरून चालायचं.
त्याची तक्रार करायची नाही.
म्हणजे मग दिवस सुखात जातात.
: एक नोकरदार माणूस.
माझं काम ओझं
वाहणं...
तक्रार नाही.
माझं काम काम
वाहणं...
तक्रार नाही.
ओझे
काम
अपेक्षा
जबाबदाऱ्या
टारगेट
मीटिंग्स
रिपोर्ट्स
डेडलाईन्स
वरिष्ठांची अपेक्षा
घरची जबाबदारी
गाढवाचं तत्वज्ञान
नोकरदाराचं वास्तव

जस्ट जोकिंग


कितीबी
गूळमाट त्वांड करून
बोललास तरी मी काय
तुझ्यासंग न्वोड
बोलायची नाय.
आवंदा
साखर
महागल्या.
समजलं.
प्रेमात गूळ चालतो...
पण आता साखर महागलीय!


आज़ाद देश
में तुम फिर से
गुलाम हो गए...
PRESS


ओह..
अब जेन अल्फ़ा
के डर से
काँपने लगे...




# आखाड्यात अडकली ऑलिम्पिकची स्वप्ने!

**सध्या मल्लांना आर्थिक पाठिंबा चांगला मिळत आहे. पण महाराष्ट्राच्या पलीकडे पाहिलं तर काय दिसतं? अलीकडे उत्तरेतील मल्लांनी ऑलिम्पिक गाजवलं. परंतु, खाशाबा जाधव यांच्यानंतर एकाही महाराष्ट्राच्या मल्लाला ऑलिम्पिक पदकाचं स्वप्न पूर्ण करता आलं नाही. हे मल्ल अजूनही 'महाराष्ट्र केसरीत'च अडकून आहेत.**

**मतीन शेख,** पत्रकार, मल्ल, कोल्हापूर

'महाराष्ट्र केसरी' हा मानाचा किताब जिंकण्याची इर्षा दर वर्षी महाराष्ट्राच्या मल्लांत दिसून येते. १९६१ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेचं महत्त्व आजही टिकून आहे. मातीत निकाली पद्धतीनं रंगणारी ही कुस्ती १९८८मध्ये मॅटवर आली आणि आंतरराष्ट्रीय कुस्तीच्या नियमांनी बांधली गेली. या निर्णयामागे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचा हा उद्देश होता की, महाराष्ट्राचे मल्ल आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचायचे असतील तर तांबड्या मातीतील कुस्ती मॅटवर आणल्याशिवाय पर्याय नाही.

परंतु, परंपरा म्हणून स्पर्धेत माती विभाग कायम ठेवण्यात आला आणि अंतिम लढत मॅटवर घेण्यास सुरुवात झाली. ऑलिम्पिक विजेते खाशाबा जाधव यांना स्पर्धेसाठी परदेशात जाण्यासाठी पैसे नव्हते. अनेक अडथळे पार करत ते स्पर्धेसाठी पोहोचले आणि त्यांनी भारतासाठी पदक जिंकले. तशी परिस्थिती आज राहिलेली नाही. मल्लांना मदतीचे हात मिळत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी मल्लांची कामगिरी कमी पडत आहे. यामागे विविध कारणे आहेत.

'महाराष्ट्र केसरी' चा किताब जिंकून कुस्तीतून निवृत्ती घेण्याचे प्रमाण जास्त आहे. हा मान मिळाला की प्रतिष्ठा मिळते, तो मल्ल नावारूपाला येतो, मोठं इनाम मिळतं आणि इथेच तो आपल्या कुस्तीची समाप्ती करतो. आपले

मल्ल ऑलिम्पिकपासून दूर राहतात, याचं हे एक सार्वत्रिक कारण दिसतं. मातीचा पारंपरिक आखाडा जपायला हवाच, पण तेवढ्यावरच समाधान मानायची मानसिकता महाराष्ट्राच्या कुस्तीसाठी घातक ठरत आहे. मोठ्या इनामाच्या स्पर्धा मातीच्या आखाड्यात होत असल्याने साहजिकच मल्लांचा ओढा या स्पर्धांकडे असतो. या स्पर्धा जिंकून चांगलं इनाम मिळवायचं व निवृत्तीनंतर हा पैसा कुठे तरी गुंतवून पुढचं जगणं कसं सुलभ होईल, याचा आराखडा अनेक मल्ल तयार करतात. या स्पर्धा जिंकण्याठी मातीच्या कुस्तीतलं आपलं कसब वाढवावं लागेल या हट्टापायी अनेक मल्ल मॅटपासून दूर राहत आहेत. निवृत्तीनंतरचा काळ अडचणीचा ठरू नये, जुन्या मल्लांसारख्या हाल अपेष्टा आपल्या वाट्यास येऊ नयेत, म्हणून आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तयारीत वेळ न घालवता खुल्या स्पर्धा जिंकून आर्थिक बाजू भक्कम करण्याकडे महाराष्ट्रातील मल्लांचा ओढा दिसतो आहे.

पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश या राज्यांतील मल्ल आणि त्यांच्या प्रशिक्षकांनी दोन दशकांआधीच मॅटवरील कुस्तीला प्राधान्य दिलं आहे. या राज्यांतील सरकारांनीही कुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी सर्व सोयीसुविधा पुरवल्या आहेत. महाराष्ट्राची स्थिती याबाबतीत वाईट असल्याचं दिसतं. अनेक तालमींमध्ये नीटनेटक्या मॅटची सुविधा देखील उपलब्ध नसल्याचं चित्र आहे. यंदा दुहेरी 'महाराष्ट्र केसरी' ठरलेला हर्षवर्धन सदगीरने माध्यमांसमोर शासनाबद्दल नाराजी व्यक्त केली.

राष्ट्रीय मल्ल असून आणि पाच वर्षांपूर्वीच 'महाराष्ट्र केसरी' किताब जिंकून देखील राज्य सरकार नोकरी देत नसल्याची खंत त्याने व्यक्त केली. सदगीरची ही नाराजी माध्यमांत झळकली तरी राज्य शासनाकडून त्याची साधी दखलही घेतली गेली नाही. 'महाराष्ट्र केसरी' जाहीरपणे सरकारी नोकरीची याचना करत असून सरकार मात्र ढिम्म असल्याचं असंवेदनशील चित्र यामधून तयार झाले. अशी सरकारी उदासीनता महाराष्ट्रातील अनेक मल्लांच्या वाट्याला आल्याने त्यांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. शासनाच्या असंवेदनशील क्रीडाविषयक धोरणांमुळे ऑलिम्पिक स्पर्धा तर दूरच, पण राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत पोहोचायलादेखील खेळाडूंना अडथळे येत आहेत. कुस्तीची पंढरी समजल्या जाणाऱ्या कोल्हापुरात तालमींची दुरवस्था झाली आहे. सोयीसुविधांचा अभाव, चांगल्या प्रशिक्षकांची वानवा असल्याने कोल्हापूरची कुस्तीतली कामगिरी रोडावली आहे. ग्रामीण भागातल्या तालमीही ओस पडल्या आहेत. काही ठिकाणी मात्र कुस्तीप्रेमींनी पदरमोड करून आखाडे बांधले आहेत. यानिमित्ताने ग्रामीण भागात कुस्ती जपण्याचा प्रयत्न होत आहे. असंच चित्र राज्यात थोड्याफार फरकानं दिसतं. शासनदरबारी मात्र कुस्तीला चालना देण्यासंदर्भात सातत्यानं उदासीनता दिसते. अलीकडच्या काळात महाराष्ट्राचं कुस्ती केंद्र पुण्याकडे सरकलं.

पुण्यात मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारल्याने मराठवाडा, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूरच्या मल्लांनी कुस्ती सरावासाठी आता पुण्याला पसंती दिली आहे. जागतिक अजिंक्यपद कुस्तीच्या पटलावर महाराष्ट्रातून अलीकडे नरसिंग यादव, संदीप यादव व राहुल

## वाद आणि राजकारण

**अलीकडे कुस्ती संघटनांमधील वाद उफाळून आले आहेत. कुस्तीक्षेत्रातील जुन्या मल्लांना जवळ करून काही राजकीय पक्षांनी कुस्ती संघटनांवर आपले वर्चस्व कसे राहील, यासाठी प्रयत्न चालवले आहेत. जुन्या संघटना व नव्याने स्थापन झालेल्या संघटनांचा संलग्नतेचा वाद कायम आहे. यामुळे एकाच वर्षी एकापेक्षा अधिक 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धांचं आयोजन होत आहे. या प्रकारामुळे नेमकी अधिकृत स्पर्धा कोणती, असा संभ्रम कुस्तीगिरांमध्ये असतो. या घडामोडींमुळे महाराष्ट्राचं कुस्तीक्षेत्र सतत ढवळून निघतं. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी विविध निवड चाचण्या घेतल्या जातात. मल्लांना संघटनांमधील वादांचा फटका अशा चाचण्यांवेळी बसतो. महाराष्ट्रातील मल्लांना आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठवायचं असेल तर कुस्ती संघटनांमधील वाद मिटवले पाहिजेत. कुस्तीच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न होणं गरजेचं आहे.**

आवारे यांच्या व्यतिरिक्त कुणाला झेंडा रोवता आला नाही. राहुल आवारे आणि नरसिंग यादव या दोन्ही मल्लांकडून महाराष्ट्राला ऑलिम्पिकच्या अपेक्षा होत्या. परंतु, वेळोवेळी उत्तरेतील कुस्तीमधील प्रस्थापित लॉबीच्या कटकारस्थानाचे हे मल्ल बळी ठरले. यंदाच्या 'महाराष्ट्र केसरी'त अनेक नवख्या मल्लांनी उत्कृष्ट कामगिरी केली. रविराज चव्हाण, जय पाटील, दिग्विजय भोंडवे, महेंद्र गायकवाड तसेच अनुभवी मल्ल हर्षवर्धन सदगीर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपण ऑलिम्पिक, आशियाई, राष्ट्रकुल स्पर्धेत लढण्यासाठी कोठेही कमी नाही याची चुणूक दाखवली. आता या मल्लांनी 'महाराष्ट्र केसरी' पर्यंतच आपल्याला मर्यादित न ठेवता कुस्तीचं जागतिक पटल जवळ करण्याची गरज आहे.

सोशल मीडियामुळे कुस्ती घराघरात पोहोचली. कुस्तीचा कंटेन्ट तयार करणारी अनेक फेसबुक पेज, यूट्युब चॅनेल महाराष्ट्रात आहेत. या माध्यमातून यात्रा, जत्रा, उरुसात भरणाऱ्या कुस्त्यांच्या फडाचे थेट प्रक्षेपण कुस्तीशौकीनांपर्यंत पोहोचवले जाते. कुस्तीची लोकप्रियता वाढवण्यात या माध्यमाचा महत्त्वाचा वाटा आहे. दरवर्षी ' महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेची चर्चा सोशल मीडियावर रंगते. विविध राजकीय पुढारी, उद्योजक मोठ्या बक्षिसांच्या कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यास उत्सुक असतात. जनसंपर्क साधण्याचे तसेच राजकीय शक्तिप्रदर्शनाचे प्रयत्न अशा स्पर्धेतून घडवून आणले जातात. आयोजकांनी या ' इव्हेंटगिरी' ऐवजी महाराष्ट्राच्या मल्लांना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले तर कुस्तीसाठी आवश्यक असणारा राजाश्रय व लोकाश्रय खऱ्या अर्थाने साध्य होईल.

'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेत विजेत्या मल्लाला शासकीय नोकरी देण्याची घोषणा सरकार कायम करतं. तीन वेळा महाराष्ट्र केसरी जिंकलेल्या मल्लास थेट 'डीवायएसपी' पद देण्याची शासनाची तरतूद आहे. परंतु, एकदा महाराष्ट्र केसरी होणाऱ्या मल्लास पीएसआय, उपमहाराष्ट्र केसरी मल्लास एएसआय व महाराष्ट्र चॅम्पियन विजेत्याला पोलिस कॉन्स्टेबल पदाची नोकरी देण्याची मागणी होत आहे. शासनाने कुस्तीसाठी इतर राज्यांच्या धर्तीवर कृती कार्यक्रम आखणं गरजेचं आहे.

# सोशल मीडिया कंपन्यांचा "टोबॅको" क्षण !

**सोशल मीडियाच्या अनिर्बंध वापरामुळे लहान वयातील मुलांना त्याचे व्यसन लागते, त्यांचे मानसिक आरोग्य बिघडते यावर आता एकमत होत आहे. उदा. अती वापरामुळे मुलांमध्ये निरुत्साह, चिंता वाढीस लागतो. अमेरिकेत काही आत्महत्या देखील झाल्या आहेत. काही देशांनी शालेय वयातील विद्यार्थ्यांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली आहे. इतर देशांच्या हा प्रस्ताव विचाराधीन आहे.**

**संजीव चांदोरकर,** सामाजिक विचारवंत, पुणे

टीन एजर्स पर्व

या पॉल्टफॉर्म्सचा सर्वात जास्त वापर अर्थातच अमेरिकेत होतो. त्या देशात बरेच काही घडत आहे. २०२१ पासून नागरिक, शाळा, म्युनिस्पॉलिटिज, राज्ये यांनी अमेरिकेतील विविध कोर्टांमध्ये जवळपास ३,००० केसेस फाइल केल्या आहेत. अलीकडेच कॅलिफोर्निया फेडरल कोर्टात २९ राज्यातर्फे मेटा प्लॅटफॉर्म, फेसबुक आणि इंस्टाग्राम, विरुद्ध केस फाइल केली गेली. मागणी आहे की या कंपन्यांनी वापरकर्त्यांच्या वयावर निर्बंध घालावेत, अमर्याद स्क्रोलिंगची सुविधा काढून टाकावी. केसची सुनावणी सुरू असताना मेटा कंपनीचे मुख्याधिकारी मार्क झुकेरबर्ग यांची देखील साक्ष काढण्यात येईल असे सांगितले जात आहे. रॉयटर्सने केलेल्या एका




# याला टोबॅको मोमेन्ट म्हणतात

सिगरेटच्या अतिरेकी वापरामुळे धूम्रपान करणाऱ्यांना अनेक प्रकारचे गंभीर आजार होत आहेत, असा आरोप सिगरेट उत्पादक कंपन्यांवर १९५० पासून केले जात होते. पण सिगारेट कंपन्यांनी सतत त्यात काही तथ्य नसल्याचे सांगितले  चार दशकानंतर अमेरिकेतील ४६ राज्य एकत्र आली , बरीच कोर्टबाजी झाली. आणि १९९८ मध्ये सिगरेट उत्पादक आणि ही राज्ये यांच्यामध्ये मास्टर सेटलमेंट अग्रीमेंट झाले.  त्यानुसर सिगरेट कंपन्यांनी या राज्यांना सिगारेट पिणाऱ्यांवर होणाऱ्या वैद्यकीय उपचारांसाठी काही लाख डॉलर्स द्यायचे मान्य केले. सिगारेट पाकिटावर वैधानिक इशारा छापण्यात येऊ लागला. १६ वर्षाखालील मुलांना सिगरेट विकण्यास बंदी घातली गेली.  सिगेरेट वर मोठा अप्रत्यक्ष कर sin tax लावण्यात येऊ लागला  सोशल  मीडियावर अमेरिकेत बंधने आली , आणि यायची तातडीची गरज देखील आहे, तर त्याचा  फायदा भारतासारख्या अनेक देशांना निश्चितच होईल.  केल्याने होत आहे रे .महाबलाढ्य मोठी कॉर्पोरेट असूदेत नाहीतर एकाधिकारशहा राज्यकर्ते, त्यांना ताळ्यावर आणायचे असेल तर संघटित ऍक्टीव्हीजमला पर्याय नाही हे पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. एकेकटे राहू नका. एकत्र या. संघटित व्हा..

सर्वेक्षणात अमेरिकेतील ८५ टक्के नागरिकांना असे वाटते की शासनाने या सोशल मीडिया कंपन्यांवर या संदर्भात अंकुश ठेवावयास हवा. अमेरिकेतील कंपन्यात काम केलेले Whistle Blowers पुढे आले आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपल्या विशिष्ट प्रोग्रामिंग मुळे लहान वयातील मुलांमध्ये व्यसनाधिनता वाढत आहे हे या कंपन्यांना पूर्णपणे माहित आहे.

किंबहुना प्रोग्रामिंग त्याच उद्देशाने केले गेलेले असते. पण आपली दर्शक संख्या, त्यांनी स्क्रीनवर घालवलेला वेळ आणि म्हणून उत्पन्न व नफा कमी होईल म्हणून या कंपन्यांनी त्यावर काहीही उपाययोजना केलेल्या नाहीत. गेली अनेक वर्षे सोशल मीडिया कंपन्यानी "आम्ही स्वतः कन्टेन्ट तयार करत नाही, आम्ही फक्त कन्टेन्ट साठी प्लॅटफॉर्म ऊपलब्ध करून देतो" अशी भूमिका घेतली आहे. पण या प्लॅटफॉर्ममध्ये असणाऱ्या अल्गोरिदम आणि तत्सम आज्ञा प्रणालीमुळे लहान वयातील वापरकर्ते तासनतास स्क्रीनवर खिळून राहतात हे आता सर्वांना माहित झाले आहे. सोशल मीडियावर फक्त निर्बंध घालण्याची मागणी नाही तर त्यांच्याकडून ज्या मुलांना मानसिक इजा झाली आहे त्यांना या कंपन्यांनी नुकसानभरपाई द्यावी अशी देखील मागणी आहे. ती मान्य झाली तर ती रक्कम काही लाख डॉलर्स असू शकते.





पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, **'क्रांतिअग्रणी पर्व'** पाक्षिक, मु.पो. कुंडल - 416 309. ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)

हे पाक्षिक संपादक चंद्रकांत लक्ष्मण रोकडे, प्रकाशक उमेश दत्तात्रय पेटकर, मालक अशोक पांडूरंग पवार यांनी मुद्रक लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, कुंडल यांचेकडे छापून कुंडल ता. पलूस, जि. सांगली येथून प्रसिध्द केले.

RNI No.: MAHMAR/2008/24954
RND/53/KRANTIAGRANIPARV/2025
SGL/53/2025-2027